२ ... ९८ ...
7926
काव्य

॥ श्रीः ॥

# पद्यमंजरी.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले
नासिककर
'पद्यमंजूषा,' 'मेघदूताचें समवृत्त मराठी भाषांतर,' इ० काव्यांचे कर्ते,
यांनीं रचिली

ती

REFBK-0000098

पुणें येथें
रावजी श्रीधर गोंधळेकर
यांचे 'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापून
पुणें येथें प्रसिद्ध केली.

इ० स० १९०२

किंमत ८ आणे.

ग्रंथकारांनीं सर्व हक्क आपणांकडे राखून
ठेविले आहेत.

१-९२८०

# प्रस्तावना.

गतवर्षी आह्मीं " मेघदूतकाव्याचें समवृत्त मराठी भाषांतर " छापून प्रसिद्ध केलें. त्याला येथील डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन् सोसायटी या संस्थेनें प्रोत्साहन दिलें, आणि सहृदय वाचकांनीं त्याचा उदारमनानें स्वीकार केला, याबद्दल त्यांचे या ठिकाणीं प्रसिद्धपणें आभार मानणें अप्रासंगिक होणार नाहीं.

निरनिराळ्या प्रसंगीं रचून ठेविलेल्या स्वकृतकाव्यसंग्रहापैकीं कांहीं प्रकरणें एकत्र करून तीं स्वतंत्र ग्रंथरूपानें छापून प्रसिद्ध करावीं असें या वर्षीं मनांत आलें. त्याप्रमाणें हा ' पद्यमंजरी ' नांवाचा ग्रंथ तयार करून तो आह्मी आज महाराष्ट्रसरस्वतीच्या मनोहर उद्यानांत स्वैर विहार करणाऱ्या रसिकांस प्रेमपूर्वक समर्पण करीत आहों.

या ग्रंथामध्यें एकंदर सतरा निरनिराळे विषय आहेत. त्यांत ईशवंदन, करुणालहरी, बोधलहरी, इत्यादि विषय बहुतेक स्वतंत्र आहेत. करुणालहरी व बोधलहरी हीं दोन्हीं काव्यें प्रथम प्रत्येकीं बावन श्लोकांचीं होतीं. परंतु कांहीं आकस्मिककारणानें दोन्ही लहरी खंडित झाल्या! करुणालहरीचे मूळच्यापैकीं बारा श्लोक राहिले; आणि बोधलहरीचें तर केवळ अष्टकच हातीं आलें! पुढें नवीन चाळीस श्लोक रचून ते अवशिष्ट राहिलेल्या करुणालहरीला जोडले. याप्रमाणें तयार झालेली करुणालहरी या

ग्रंथांत दिली आहे. प्रस्तुतलहरींत पहिल्याप्रमाणें कल्पनांचा क्रम व संगति हीं कायम राहिलीं नाहींत. तिच्यांतील श्लोक संसारांतील विविध व विचित्र प्रसंग अनुभवून गोंधळलेल्या मनाचे परमेश्वराप्रत करुणोद्गार आहेत; आणि याच दृष्टीनें वाचकांनीं ते वाचावयाचे आहेत. **करुणालहरी**मध्यें प्रत्येक श्लोकांतील शेवटच्या चरणांत पहिल्या चार अक्षरांपैकीं पहिलें सोडून बाकीच्या तीन अक्षरांची आवृत्ति बहुतकरून साधली आहे. **बोधलहरी** पुरी करण्याचें मनांत आणलें नाहीं. कारण, तिच्यांत शब्दचित्राचाच विशेष चमत्कार असल्यामुळें ती कदाचित् वाचकांस कंटाळवाणी होईल असें वाटलें.

इतर बहुतेक विषय **श्रीमच्छंकराचार्य, कालिदास, जगन्नाथराय** इत्यादि रसिकमान्य आणि अभियुक्त कवींच्या अत्यंतमनोरम काव्यग्रंथांतून घेतले आहेत. **सौंदर्यलहरी** व **संमोहखंडन** यांस **आचार्यांचे** ग्रंथ आधार आहेत. **आचार्यांच्या सौंदर्यलहरी**स्तोत्राची प्राचीनपंडितांमध्यें मोठी मान्यता आहे. प्रस्तुत लहरीवर **सुधाविद्योतिनी, सौभाग्यवर्धिनी, लक्ष्मीधरा, डिंडिमा** इत्यादि अनेक टीका आहेत. या स्तोत्राला प्राकृतजन '**सुंदरलहरी**' असें ह्मणतात. **परब्रह्माची** मुख्य शक्ति—जिला **महाविद्या, मूलप्रकृति** इत्यादि नांवें आहेत—तिचें या स्तोत्रांत वर्णन आहे. या काव्यांत **आचार्यांची** देवताविषयक रति उत्कृष्टपणें व्यक्त झाली आहे. तिच्या अनुषंगानें या स्तोत्रांत अनेक काव्यचमत्कार आढळतात. कित्येक कल्पना तर फारच अपूर्व आहेत. असो. या स्तोत्रांतील आरंभींचीं कांहीं पद्यें व शेवटचीं भगवतीच्या अवयववर्णनाचीं कांहीं

पद्यें एवढ्याचेंच मराठी भाषांतर करून आह्मीं या ग्रंथांत घातलें आहे. **जटिल, हिमालयवर्णन,** आणि **रतिविलाप** हीं प्रकरणें **कुमारसंभवांतून** घेतलीं आहेत. **अजविलाप रघुवंशांतून** उतरला आहे. **करुणाविलासाला भामिनी-विलासाचा** आधार आहे. इतर कविता निरनिराळ्या संस्कृत कवींच्या ग्रंथांवरून रचिल्या आहेत.

या ग्रंथांत जे भाग भाषांतररूपानें दिले आहेत ते मूलग्रंथांतील प्रत्येक शब्द घेऊन रचिलेले नाहींत. त्यांमध्यें मूलांतील तात्पर्यार्थ मात्र आणण्याचा यत्न केला आहे.

शिवाय, या काव्यांत जेथें **आर्या** असें वृत्ताचें नांव लिहिलें आहे तेथें ती **गीति** समजावी. या ग्रंथांतील ठळक चुकांचें शुद्धिपत्र पुढें दिलें आहे त्याप्रमाणें ग्रंथ शुद्ध करून मग वाचावा.

एकंदरींत हा ग्रंथ केवळ मराठी वाचकांना स्वतंत्र मराठी काव्याप्रमाणें वाचण्याच्या उपयोगीं पडण्यासारखा आहे. यांत विषयवैचित्र्याप्रमाणें वृत्तवैचित्र्यही आहे. वाचकांच्या मनाला आल्हाद होऊन बोध होईल अशी यांतील विषयांची योजना केली आहे. आह्मी लिहितों याचा अनुभव वाचकांना आला तर ही **पद्यमंजरी** रचण्याचा हेतु सफल झाला असें होईल.

**मम्मटाचार्यांनीं** ज्यांत आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें त्या **काव्यप्रकाशांतील** गुणदोषनिकषाला कित्येक उज्ज्वल कविरत्नें ही उतरलीं नाहींत, ही गोष्ट मनांत आली ह्मणजे प्रस्तुत अल्पप्रयत्नाविषयीं आमचें मन अत्यंत साशंक होतें. तथापि,

गुणदोषौ बुधो गृह्णन्निन्दुक्ष्वेडाविवेश्वरः
शिरसा श्लाघते पूर्वं परं कण्ठे नियच्छति ॥ १ ॥

या सुभाषितावर दृष्टि देऊन आणि

परि प्रभुहि संग्रहीं सकलवस्तुला ठेविती
गुणा न ह्मणतां उणा अधिक आदरें सेविती ॥

या सर्वश्रुत केकारवावर आप्तवाक्याप्रमाणें विश्वास ठेऊन आह्मी ही **पद्यमंजरी** प्रसिद्ध करीत आहों.

या ग्रंथावर अभिप्राय देणाऱ्या परमपूज्य परमहंसांचें व थोर गृहस्थांचें आह्मी फार आभारी आहों.

पुणें, सदाशिवपेठ, घर नं० ७८२
कार्तिक शु० २ शके १८२४.
} लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.

---

१ शिव ज्याप्रमाणें चंद्राला मस्तकावर धारण करून हालाहल विषाचा कंठामधें निरोध करितो, त्याप्रमाणें विद्वान् मनुष्य दुसऱ्याच्या गुणांचें मान डोलवून अभिनंदन करितो आणि दोषांचें कंठाच्या आंत नियमन करितो, ह्मणजे दोषांचें उद्घाटन करीत नाहीं; असा या श्लोकाचा तात्पर्यार्थ आहे.

# अभिप्राय.

ॐ

लक्ष्मणाख्येन कविना जनस्थाननिवासिना
लेलेवंशप्रसूतेन सतां संग्रथिता मुदे ॥ १ ॥
निसर्गरम्या रामेव पदविभ्रमशालिनी
रसिकस्वान्तजयिनी हृद्येयं पद्यमंजरी ॥ २ ॥
एतद्गतं सुललितं लहरीत्रितयं मम
संन्यासिनोऽपि प्रलभं विलोभयति मानसम् ! ॥ ३ ॥
(श्रीमत्परमहंसः) चिदानन्दः.

---

I have read some of the pieces which make up Mr. Laxman Shastry Lele's Padyamanjari. They appear to me to be meritorious and very readable. In most cases the sense of the verses is perspicuous and it costs no effort to understand them. Though I do not think liberties should be taken with Marathi orthography to meet the exigencies of metre, there are not many instances of the kind in the book; and the language is classical. As a whole the Padyamanjari is a work of merit.

Sangamashrama, Poona.
31 October 1902. } R. G. Bhandarkar.

---

पद्यमंजरी हा हस्तलिखित ग्रंथ मी समग्र वाचून पाहिला. तेणेंकरून मनाला फार संतोष झाला. करुणालहरी यमकचमत्कारयुक्त

असून करुणरसपरिप्लुत आहे. असला चमत्कार महाराष्ट्रकाव्यांमध्यें प्राय: दृष्टीस पडत नाहीं. **ईशवंदन** उदात्त आहे. **बोधलहरी** शब्द-चित्राचा सुंदर नमुना आहे. **हिमालयवर्णन**, **रतिविलाप**, आणि विशेषत: **अजविलाप**, **करुणविलास**, **अन्योक्तिसंग्रह** आणि **दमयन्ती** या कविता अत्यंत सरस व मधुर उतरल्या आहेत. कै० **कृष्णशास्त्री चिपळूणकर** यांच्या सहृदयाल्हादिनी **पद्यरत्नावली**तील कोणत्याही कवितांपेक्षां प्रस्तुत कविता निःसंशय कमी योग्यतेच्या नाहींत. **सौंदर्यलहरी** व **जटिल** यांत भाषांतराची करामत दिसून येते. **सूर्योदय**, **यमुनागीत** व **कविप्रशंसा** यांत कविप्रतिभा प्रकट झाली आहे. **विदुरोपदेश** गंभीर असून चटकदार आहे. **बोधामृत** व **संमोहखंडन** यांनीं आपलीं नावें या काव्यांत अन्वर्थक करून सोडलीं आहेत. सारांश, या काव्यांतील सगळेच भाग सरस व चित्ताकर्षक वठले आहेत. प्रसाद व माधुर्य हे काव्यगुण प्रस्तुतकाव्यांत सुव्यक्त झाले आहेत. यमक व अनुप्रास हे शब्दालंकार व विविध अर्थालंकार यांनीं **पद्यमंजरी** मंडित झाल्यामुळें ती निर्मत्सररसिकाच्या प्रसादास पात्र होईल यांत संशय नाहीं. कवीनें प्रसंगविशेषीं सविस्तर टिपा दिल्या आहेत; त्यांतही त्याचे मार्मिकपणा, बहुश्रुतपणा व भाषानैपुण्य हे गुण दिसून येतात. कवीची वाणी प्रसन्न, प्रौढ व उदार असून त्याची शब्दयोजना विषयानुकूल व रसानुगुण आहे.

या काव्यांत गुणांच्या मानानें दोष फार थोडे आहेत, आणि तेही क्षुद्र आहेत. दोन तीन ठिकाणीं यतिविच्छेद आला आहे तथापि तो अनुप्रासाच्या खटपटीमुळें अपरिहार्य झालेला दिसतो. दूरान्वय क्वचित् आढळतो. अप्रयुक्तत्व, न्यूनाधिकपदत्व असे दोष स्थलविशेषीं सापडणार नाहींत असें नाहीं तरी पण काव्याच्या गुणसंनिपातामध्यें असले दोष लुप्त झाले आहेत व काव्याचे मनोहरसौंदर्य व आल्हादजनकत्व हे गुण अबाधित राहिले आहेत. असो.

**पद्यमंजरी** हा रमणीय काव्यग्रंथ कै० **परशुरामपंत गोड**-

**बोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर** इत्यादि अर्वाचीन **महाराष्ट्र** कवींच्या रसिकमान्य व प्रतिष्ठित कृतींच्या पंक्तीला बसण्याला सर्वथैव पात्र आहे. आलीकडील **मराठी** काव्यसंग्रहामध्यें प्रस्तुत काव्याला उच्चस्थान मिळेल व त्याच्या कर्त्याची या एवढ्याच काव्यावर देखील विशेष प्रतिष्ठा होईल असें मला वाटतें.

**काव्यलोलुप.**

---

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| १ ईशवन्दन | १ |
| २ अन्योक्तिसंग्रह | ५ |
| ३ करुणविलास | १८ |
| ४ बोधलहरी | २२ |
| ५ यमुनागीत | २४ |
| ६ हिमालयवर्णन | २५ |
| ७ करुणालहरी | २७ |
| ८ जटिल | ३९ |
| ९ विदुरोपदेश | ४४ |
| १० सौन्दर्यलहरी | ४६ |
| ११ अजविलाप | ५७ |
| १२ संमोहखंडन | ६१ |
| १३ सूर्योदय | ६४ |
| १४ कविप्रशंसा | ६६ |
| १५ रतिविलाप | ७१ |
| १६ दमयन्ती | ७६ |
| १७ बोधामृत | ८० |

# शुद्धिपत्र.

-:o:-

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १६ | ३ | परभ ' | परम |
| ,, | ,, | नीच | नीचं |
| ,, | १२ | हे | ते |
| ,, | १४ | जावन | जीवन |
| २२ | ६ | येई | येइ |
| २४ | १६ | जें | जें |
| २७ | ५ | सार्थ | साथ |
| २९ | ५ | असे | असें |
| ३१ | ९ | तंवीर | तंवरि |
| ३३ | ८ | करीं | करी |
| ४२ | १ | आहं | आहे |
| ,, | ४ | त्रैलाक्यांतिल | त्रैलोक्यांतिल |
| ४९ | १ | असती | असतीं |
| ,, | ८ | निपजे | निपजें |
| ५० | १३ | वाटे | वाटें |
| ,, | १४ | वरिति | वरितिं |
| ,, | १५ | स्तविति | स्तवितिं |
| ५१ | ८ | असे | असें |
| ५२ | ७ | त्यातें | त्यांतें |
| ६३ | १६ | तरी | तरि |
| ६६ | २६ | करूणरसानें | करुणरसानें |
| ६९ | ८ | ज्याचे | ज्याचें |
| ,, | १२ | दे ती | देती |
| ,, | १९ | वाणी | देणारी |
| ७२ | १६ | मज लागोनी | मजलागोनी |
| ७३ | १५ | ' तुजविण | तुजविण |
| ७३ | १७ | ' मजला | मजला |
| ७८ | १९ | फसवितोंसि | फसवितोसि |
| ७९ | १८ | प्रिर्या तें | प्रियेंतें |

श्रीः

# पद्यमंजरी.

## ईशवंदन.

पृथ्वी.

प्रभो ! सुयश वर्णितां तव कवीन्द्रही भागले,
[1]विलीन मग होउनी [2]चरणपंकजीं लागले
न [3]मुक्ति [4]नतिवांचुनी, सुलभ [5]योग हा [6]मानवां
ह्मणोनि नति अर्पितों त्यजुनि मीपणा [7]मान वा ॥ १ ॥
प्रभातिं रवि येउनी [8]उदयशैलसानूवरी
[9]करीं [10]तिमिर सारुनी विमल विश्व सारें करी
प्रसन्न [11]रजनीसखा [12]सकलमानसा तोषवी
प्रभो ! कृति तुझीच ही, सकल सांगती सत्कवी ॥ २ ॥
विभो ! दिवस, रात्र ही, [13]हिम, [14]निदाघ, [15]वर्षा, तसे
[16]अबाधि ऋतुचक्रही क्रमवशेंचि चालू असे
शशी रवि दुजे ग्रह स्थिति न सोडितां चालती
[17]नभीं, कृति तुझीच ही, कवि असें जनीं सांगती ॥ ३ ॥
[18]अनंतसलिलाशयांमधुनि [19]बाष्परूपें जल

---

टि० १ फार नम्र. २ पादकमलीं. ३ मोक्ष. ४ नमनावांचून. ५ तुझ्या स्वरूपांत मिळून जाण्याचा मार्ग. ६ मनुष्यांना. ७ गर्व. ८ उदयपर्वताच्या शिखरावर. ९ किरणांनीं. १० अंधकार. ११ चंद्र. १२ सकल जनांच्या चित्ताला. १३ हिंवाळा. १४ उन्हाळा. १५ पावसाळा. १६ अप्रतिबंध. १७ नभीं चालती इ० अन्वय. १८ असंख्य पाण्याच्या सांठ्यांमधून. १९ वाफेच्या रूपानें.

निघोनि वरि अंबरीं[1] घन विनिर्मितें[2] श्यामल[3]
पुन्हां जलचि वर्षुनी मिळति ते[4] स्वरूपाप्रती[5]
प्रभो ! कृति तुझीच ही, कवि असें जनीं बोलती ॥ ४ ॥
असे सहजशत्रुता[6] सलिलपावकांभीतरीं[7]
तरी उभयतां सुखें विहरताति मेघान्तरीं[8]
'अहा ! नवल देखिलें,' जन असें चमत्कारती[9]
प्रभो ! कृति तुझीच ही, सुकवि वैखरी[10] बोलती ॥ ५ ॥
वनीं तरुपरंपरा[11] विविधवल्लरीमंडिता[12]
वसंतसमयीं जलाविणहि पल्लवालंकृता[13]
सुरम्य सुमनें[14], फलें रुचिर ही, तिला लाभती
प्रभो ! कृति तुझीच ही, सुकवि हें जनीं सांगती ॥६॥
तरूवरुनि अल्पसा विटप[15] खंडुनी[16] काढिला
महीतलिं[17] दुज्या तरूवरिहि वा जरी लाविला
तरी पुनरपि प्रभो ! तरु तयांतुनी उद्भवे
[18]नवीन; विभवें[19] तुझ्या सकल हें असें संभवें ॥ ७ ॥
[20]दिनेश निजवैभवें प्रगटतां नभोमंडलीं
करी धवल मंदसें [21]हसित पंकजश्री[22] भली
निशारमण[23] देखुनी कुमुदिनी[24] मदें हर्षती

---

१ आकाशांत. २ उत्पन्न करितें. याचा कर्ता 'जल' व कर्म 'घन' (मेघ) होय. ३ काळे. हे घन यांचें विशेषण. ४ घन. ५ जलरूपाप्रत. ६ स्वाभाविक वैर. ७ पाणी आणि विस्तव यांच्या मध्यें. ८ मेघामध्यें. ९ चमत्कार वाटून बोलतात. १० वाणी. ११ झाडांची रांग. १२ नानाप्रकारच्या वेलींनीं सुशोभित. १३ पालवीनें नटलेली. १४ फुलें. १५ तुकडा, खांदी. १६ तोडून. १७ जमिनींत. १८ नवीन तरु उद्भवे इत्यादि अन्वय. १९ सत्तेनें. २० सूर्य. २१ हास्य. २२ सूर्यविकासि-कमलाची शोभा. २३ चंद्र. २४ चंद्रविकासिनी कमलिनी.

प्रभो ! कृति तुझीच ही, कवि असें जनीं बोलती ॥ ८ ॥
सुवर्णरजतादिकीं[1] सकलधातुंनीं रंजिता[2]
महार्घमणिमंडिता[3] विपुलसस्यशोभान्विता[4]
ह्मणोनिच वसुंधरापद[5] वैरी[6] मही सुंदर
प्रभो ! कृति तुझीच ही, वदति मान्य विद्वद्वरँ[7] ॥ ९ ॥
नगांवरि[8] विराजती सरसवीर्यसंशालिनी[9]
प्रफुल्लित वनस्पती सकललोकसंजीविनी[10]
तरूहि फलपल्लवीं[11] अमित जीव हे पोषिती
प्रभो ! कृति तुझीच ही, कवि वदे असे सन्मती ॥ १० ॥
विशिष्ट गुण राहती भुवनिं वस्तुवस्तूमधें
दुजाचि गुण मिश्रणीं प्रगटतो कृपांभोनिधे[12] !
परी विकृति[13] ही अशा परम सुंदरा वाटती
प्रभो ! कृति तुझीच ही, कवि असें वदे सन्मती ॥ ११ ॥
असंख्य, विविध, प्रभो ! असति जीव विश्वान्तरीं
जलीं किति, नभीं किती, विचरती किती भूवरी
विचित्र कृति ही अशी मतिस माझिया गुंगवी
तुझीच कृति ही असे, वदतसे जनीं सत्कवी ॥ १२ ॥
मही, गगनही तसें जलचरांस मानेच ना
न वारि न च भूमि ही तशि नभश्चरांच्या[14] गणां[15]

---

१ सोनें, रुपें इत्यादिकांनीं; हें पुढील पदाचें विशेषण. २ चित्र-विचित्र झालेली, रंगलेली. ३ मोठ्या किंमतीच्या रत्नांनीं सुशोभित. ४ मोठ्या धान्यसंपत्तीनें युक्त. ५ ‘ संपत्ति धारण करणारी ’ अशी पदवी. ६ धारण करिते. ७ मोठे विद्वान्. ८ पर्वतांवर. ९ रस आणि वीर्य यांनीं युक्त आणि ह्मणूनच फार शोभणाऱ्या. १० सकल लोकांना तारणाऱ्या. ११ फळें व पाला यांनीं. १२ कृपासागरा. १३ विकार, प्रकार. १४ पक्ष्यांच्या. या श्लोकांत केलेलीं विधानें अगदीं निरपवाद नाहींत. १५ समुदायांना.

महीवरिल जीव ते जलिं न वा नभीं राहती
तुझीच कृति ही असे, कवि असें जनीं सांगती ॥१३॥
अगा ! प्रबल दुर्बलां जिणुनि मारिती, भक्षिती
असे कितितरी बळी पडति त्यां नसे कीं मिती
खरीच ह्मण, 'पोसती[2] अमित जीव जीवांवरी'
प्रभो ! कृति तुझीच ही, सुकवि हे वदे वैखरी[1] ॥ १४ ॥
विशालमतिवैभवें[3], प्रकटवाक्प्रभावें[4] वर[5]
असे अखिलसृष्टिचा अनभिषिक्त[6] राजा नर
स्वकीय अधिकार तो सतत भूवरी गाजवी
कृपा तवचि ही, असा सुकवि दुंदुभी[7] वाजवी ॥ १५ ॥
अशी वरतनू[8], अगा प्रभुवरा ! मला लाभली
गमेल कृतकृत्यता जरि तुझ्या पदीं लागली
असें[9] परम दीन मी, असशि तूं दयासागर
ह्मणोनि विनयें तुझ्या जवळि मागतों हा वर[10] ॥ १६ ॥
कथामृतझरी[11] तुझी श्रवण[12] हे करो पावन[13]
करोत कर हे तुझें विमलपादसंसेवन[14]
बघोत तव रूप हे नयन, नाम वाचे घडो
प्रभो ! सतत मन्मना तवचि छंद तो आवडो ॥ १७ ॥

---

१ वचन, उक्ति. २ 'जीवो जीवस्य जीवनम्' या ह्मणीची ही छाया आहे. ३ प्रचंडबुद्धिसामर्थ्यानें. ४ स्पष्टवाणीच्या बलानें. ५ श्रेष्ठ. ६ अभिषेक न झालेला. ७ नगारा. ८ उत्कृष्ट देह. ९ पुढील श्लोकांतला. १० प्रसाद, मागणें. ११ कथारूप अमृताचा झरा. १२ कान. १३ पवित्र. १४ पवित्र पायांची चांगली सेवा.

# अन्योक्तिसंग्रह.

## चातकान्योक्ति.

शा. वि.

वारी वर्षुनिया निवारिति तृषा ते मेघ होती दुजे
हाका मारुनि मारुनी मुख, सख्या! गेलें मुकोनी तुझें
आहे निर्जल, शुभ्र, अंबुद[1] शरत्[2]कालीन हा, चातका[3]!
नाहीं पोकळगर्जनेविण दुजा व्यापार या ठाउका ॥१॥

व. ति.

फुल्लांबुजालि[4] अलिचुंबित डोलतात
हंसावली विहरती प्रमदें जयांत[5]
थोडे असे असति कीं [6]जलसंनिवेश?
याची [7]जलार्थ परि चातक निर्जरेश[8]! ॥ २ ॥

आर्या.

मानी[9] खग[10] एक गमे चातक, त्या दीर्घ आयु लाभावें
सोडी प्राण तृषेनें, याची अथवा बलारि[11]ला भावें[12] ॥३॥

## वायसान्योक्ति.

दिंडी.

अगा विहगा [13]वायसा! गा खुशाल
होय त्याचा तुजकडे काय बोल[14]?
आम्रवृक्षीं तव सरलकोकिलाशीं
जयें संगति[15] घडविली दोष [16]त्याशी! ॥ ४ ॥

---

१ मेघ. २ शरदृतूंतला. ३ अगा चातकपक्ष्या. ४ प्रफुल्लितकमलांची रांग. ५ ज्या जलसंचयांत. ६ पाण्याचे सांठे ७ पाण्याकरितां. ८ इंद्राला; हें 'याची' याचें कर्म. ९ अभिमानी. १० पक्षी. ११ बलशत्रूला; इंद्राला. १२ प्रेमपूर्वक. १३ काकपक्ष्या. १४ दोष. १५ सहवास. १६ त्या विधात्याला.

वसो आम्रवनीं, कृष्ण अंग दावो,
करो मंजरिशीं संग, फळें खावो
करो पिकैँसे काक हे सर्व खेळ
परी त्याला मधुसमय जाणवेल ! ॥ ५ ॥

शा. वि

कीं बोले शुकसा? तनू विलसते किंवा मयूरापरी?
कीं हंसासम अंगनांस शिकवी चालावयाची पैरी?
संलापें रसिकांस बालपिकसा कीं रंजवी अंतरीं?
कौंका काय ह्मणोनि कांचनमयीं या ठेविलें पंजरीं? ॥६॥

## मयूरान्योक्ति.

आर्या.

याँचीं न चातकापरि जीवन तुजपाशि जीवनधरा हे!
मी नीलकंठ आहें, तव शब्देंचि प्रसन्नता राहे ॥७॥

शा. वि.

मित्रा! या मलयावरी विहरती लक्षावधी पांखरें
रावे, हंस, कपोत, कोकिल तसे ते पारवे, हें खरें
जेव्हां शब्द परी मयूर करितो, तेव्हांचि तो चन्दन ॥
होई लभ्य जनां, सुटोनि सगळें व्यालावलीबंधन ॥ ८ ॥

## शुकान्योक्ति.

मालिनी.

उडति अखिल पक्षी अंतरिक्षीं भरारा
मधुनि बसति वृक्षीं, लक्षिती लोक सारा
नवफलसुमनांचा लाभ होतो तयांस
तुजसि मधुरवाणी दे, शुका! बंदिवास ॥ ९ ॥

---

* कोकिळासारखे. १ वसंत. हा कोकिलांचा गानाचा समय आहे. २ प्रकार. ३ कावळ्याला. ४ सोन्याच्या. ५ याचा कर्ता 'मी' अध्याहृत. ६ अगा मेघा. ७ मलयपर्वतावर. ८ सर्पपंक्तीचें वेष्टन.

दिंडी.

सोनियाचा पिंजरा बसायाला
पाचमंडित[1] मृदुदंड फिरायाला
मधुर दाडिमफल[2] नित्य खावयाला
स्फटिकपात्रीं जल विमल प्यावयाला ॥ १० ॥
नृपति न्हाणी मज आपुल्या करांनीं
'राम,' 'विठ्ठल,' 'गोविंद,' वदवि[3] राणी
सुखें ऐशीं हीं सकल असुनि भावें[4]
चित्त माझें कोटराकडे[5] धावें ! ॥ ११ ॥

## हंसान्योक्ति.

पृथ्वी.

सुगंध बहु ज्यांतलें[6] कमलरेणुंनीं[7] जीवन[8]
अशा विमलमानसीं[9] प्रथम जो करी जीवनं[10]
द्विजेंद्र[11] कलहंस तो वसति केविं आतां करी
तया मलिनपल्वलीं[12]? उडति ज्यांत भेकावली[13] ॥ १२ ॥

दिंडी.

अमृततनुनें[14] नयनांस तोष देई
वारि वर्षुनि संताप लया नेई
तया मेघाचा उदय तुज न साहे
तुझी हंसा! तनु मात्र धवल आहे ! ॥ १३ ॥
हंस वाटेचा शीण निवाराया

---

१ पाचमण्यांनीं खचलेला. २ डाळिंब. ३ बोलविते. ४ मनापासून. ५ खोप्याकडे. ६ ज्या मानससरोवरांतलें ७ कमलांतील रज लागून. ८ पाणी; ज्यांतलें जीवन इ. अन्वय. ९ पवित्र मानससरोवरांत. १० वास. ११ पक्षिश्रेष्ठ. १२ घाणेरड्या डबक्यांत. १३ अनेक बेडूक. १४ उदकमय देहानें.

पातलासे बक[१] वसति तया ठायां
हंसुनि टोंचिती ते[२] चंचुनी तेदंग
नाहिं बाधत कवणास नीचसंग ? ॥ १४ ॥

## बकान्योक्ति.

दिंडी.

भृकुटि हलती ना, स्तिमित चंचुचाळे
पंख निश्चल, मानही मुळिं न हाले
दृष्टि नासाग्रीं लीन करिशि साची
बका ! धरिशी कां वृत्ति तापसाची[३] ? ॥ १५ ॥
वसति कासारीं, रंग धवल साचा,
गमन[४] सुंदर येईल मधुर वाचा
क्षीरवारीचा[५] भेदविधि कराया
बका ! योजीशिल कोणत्या उपाया ? ॥ १६ ॥

## कोकिलान्योक्ति.

द्रु. वि.

त्यजुनि मान, अगा सखया ! पिका !
मधुर पंचमराग[६] वदे निका[७]
न वदशी तरि ' वायस हा ' अशी
समज होइल मानवमानसीं ॥ १७ ॥

व. ति.

बा कोकिला ! कुटजवृक्षिं[८] मरुप्रदेशीं[९]

---

१ बक, बगळे. २ त्या हंसाचें अंग. ३ तपस्व्याची. ४ सुंदर गमन (आणि) मधुर वाचा (शिकलास तर) येईल. ५ दूध आणि पाणी यांच्या मिश्रणांतून एकापासून दुसरें वेगळें करून दाखविणें ही क्रिया. ६ कोकिल पंचमांत गातो अशी कविप्रसिद्धि आहे. ७ चांगला. ८ कुड्याच्या झाडावर. ९ मारवाडांत.

गाऊनि कां निजमुखा बहु शीण देशी ?
जेथें सुभाषित तुझें रिझवी जनाला
तो प्रांत आम्रतरुचा अगदीं निराळा ! ॥ १८ ॥

दिंडी.

करो मंजुल कलहंस गान आजी
मधुर गुंजारव करो भृंगराजी
करो बर्हीं रव पसरुनी पिसारा
मौन धरुनी बैसला पिकें बिचारा ! ॥ १९ ॥

## भ्रमरान्योक्ति.

दिंडी.

मुळिंच चंपककलिकेस पुसत नाहीं
आम्रमंजरिचा विरह सुखें साही
कमलरेणू मृदु मधुर न घे खाया
दवडि सुंदर पाटलामोद वायां ॥ २० ॥
अल्प आदर मंदारतरुस दावी
अशी सहसा कां वृत्ति पालटावी ?
ह्मणुनि वाटे माझिया मानसाला
भृंगतरुणा मालतीलाभ झाला ! ॥ २१ ॥

साकी.

मत्तमतंगजगंडमदावरि जे उदयाला आले
प्रफुल्लकमलस्थितरेणूंनीं फार सुगंधित झाले ॥ २२ ॥

---

१ भ्रमरांची पंक्ति. * मोर. २ कोकिल. ३ पाटलपुष्पांचा सुगंध. ४ फारच थोडा. ५ तरुणभ्रमराला. ६ मालतीची प्राप्ति. ७ येथें दोन्ही दिंड्या मिळून एक अन्योक्ति आहे. ८ माजलेल्या हत्तीच्या गंडांतील मद प्राशन करून. ९ लहानाचे मोठे झाले. १० प्रफुल्लितकमलांतील रज लागून.

तेच मधु[1]व्रत आतां अपुला कंठिति काळ जगांत
निंबतरूवरि अर्क[2]कुसुमिं वा बैसुनिया दिनरात ॥ २३ ॥

दिंडी.

चुंबितांना उद्यानिं मंजरींला
नाहिं भृंगें हुंगिलें माधवीला[3]
रसिक नोहे तो? ती न काय रम्य?
हेतु ईशेच्छेविण न यांतें[4] गम्यें[5]! ॥ २४ ॥

## कमलान्योक्ति.

वं. ति.

नक्षत्र[6]नाथ दिसतां गगनो[7]दरांत
आनंदती सकल जीव जनीं नितान्त[8]
तूं मात्र होशि, कमला[9]! अतिखिन्न, हाय!
होई विधीचें* उलटा! तुज बोल[10] काय! ॥२५॥

आर्या.

वास जलांत[11] करीशी मधुपीं[12] प्रणया[13]तिरेक तव राहे

---

१ भ्रमर. २ रुईच्या फुलावर. या दोन्ही साक्या मिळून एक अन्योक्ति आहे. ३ माधवीलतेला. ४ भृंग व मालती हीं उभयतां अनुरूप असून त्यांचा संयोग घडून आला नाहीं या गोष्टीमध्यें. ५ समजण्यासारखा. ६ चंद्र. ७ आकाशांत. ८ अत्यंत. ९ हे कमला, कमल अर्थात् सूर्योदयीं विकास पावणारें आहे. * दैवच. १० दोष. ११ पाण्यांत; विरोधपक्षीं जडांत, मूर्खांत. ड आणि ल या वर्णांचें संस्कृतभाषेंत सावर्ण्य आहे. १२ भ्रमरांवर; विरोधपक्षीं मद्यप्यांवर. १३ अत्यंत (फाजील) प्रेम.

तरि मित्रोदयिं[1] हर्षसि[2]! नवल असे थोर, पंकजवरा[3]! हें ॥२६॥

पुष्पिताग्रा.

विकसित[4]कमला! तुझ्या रसाला[5]
पिउनि करो मधु गान भृंगमाला[6]
परिमल निरपेक्ष[7] दूर वाही[8]
पवन, असा[9] तव बंधु* अन्य नाहीं! ॥ २७ ॥
बक तव अवहेलना[10] करीती
ह्मणुनि विषाद[11] धरीशि काय चित्तीं?
कमलिनि[12]! मकरंदमर्मवेत्ते[13]
भ्रमर चिरायु[14] असोत येथ[15], गे! ते[16] ॥ २८ ॥

शिखरिणी

प्रसन्नीं[17] कासारीं जनन[18], हरिहस्तीं निवसन[19]
स्वतां सद्म[20] [21]श्रीचें, परिमल हरी दानवमन[22]
गुणांनीं या पूर्णा तव तनु दिसे, अंबुजे[23]! बरी

---

१ सूर्योदयाच्या वेळीं; विरोधपक्षीं स्नेह्याच्या उत्कर्षकालीं. २ प्रफुल्लित होतोस; विरोधपक्षीं आनंदित होतोस. ३ अगा कमलश्रेष्ठा; विरोधपक्षीं चिखलांत जन्म पावणारांमध्यें श्रेष्ठा; अर्थात् हीनकुलशिरोमणे, पंकजाच्या नैसर्गिक स्थितीवर श्लेषानें विरोध कल्पून या पद्यांत चमत्कार वर्णन केला आहे. ४ फुललेल्या कमला. ५ गोड. ६ भ्रमरपंक्ति. ७ मोबदल्याची अपेक्षा न करितां. ८ वाहून नेतो; विखरितो, पसरतो. यास कर्ता ' पवन ' व कर्म ' परिमल. ' ९ वर सांगितलेल्या योग्यतेचा. * मित्र. १० अपमान. ११ खेद. १२ गे कमलिनी! १३ कमलांतील रसाची खुबी जाणणारे. १४ दीर्घायु. १५ या जगांत. १६ प्रसिद्ध. १७ निर्मळ अशा. १८ जन्म. १९ वसति. २० घर. २१ लक्ष्मीचें. लक्ष्मी कमलनिवासिनी आहे हें प्रसिद्ध आहे. २२ देवांचें मन. २३ अगा कमला!

द्विजोत्तंसीं[1] हंसीं जरि रति[2] तरी उन्नति[3] खरी ॥ २९ ॥

## जलान्योक्ति.

शा. वि.

अंगीं शीतलता वसे, तव असे स्वाभाविक स्वच्छता
स्पर्शांनी तुज शुद्धि पावति जनीं जे कां अशुद्ध स्वतां
वानूं मी बहु काय जीवनाचि[4] तूं प्रत्यक्ष तें आमुचें
जाणें नीचेपथें[5] सदा परि तुला बापा जळा[6]! कां रुचे? ॥३०॥

## कुंडलान्योक्ति.

शा. वि.

त्वां मोठें तप अग्निशस्त्रसलिलां[7] सेवोनि केलें असे
त्या योगेंचि सुवर्णरूप[8] तुजला हें प्राप्त झालें असें
रामारम्यकपोलचुंबन[9] घडे, रत्नांचिही संगति
हो आतां तरि कुंडला स्थिर! पुरे; हे हेलकावे किती? ॥३१॥

## चंदनान्योक्ति.

प्रहर्षिणी.

जे कोणी तव तनु चूर्णिताति[10] हस्तें
गंधानें[11] सुखविशि त्यांहि तूं जनांतें
हा ऐसा तव परिपाठ[12] लोकमान्य
पाटीरा[13]! तुजसम तूंचि, बा! वदान्य[14] ॥ ३२ ॥

---

१ पक्षिश्रेष्ठ अशा. २ प्रेम, भाव. ३ उत्कर्ष, मोठेपणा. ४ प्राण. ५ निंद्य मार्गानें. नीच हें पद श्लिष्ट असल्यामुळें तें या श्लोकांतील विरोधात्मक चमत्काराला उपयोगीं पडलें. उदकाची नीचमार्गानें जाण्याची प्रवृत्ति स्वभावसिद्धच आहे. ६ उदका! ड आणि ल यांच्या सावर्ण्यानें 'जडा'! (वेड्या!). ७ अग्नि, शस्त्र आणि उदक यांना. ८ सुवर्णाचें रूप, ९ स्त्रियांच्या सुंदर गालांचें चुंबन. १० चुरतात, चूर्ण करितातच. ११ वासानें. १२ पद्धति, संप्रदाय. १३ अगा चंदना! १४ उदार. येथें अनन्वय अलंकारानें पाटीराचा अनन्यसाधारण उत्कर्ष वर्णिला आहे.

आर्या.

जरि विधि चंदनतरुला फलकुसुमीं[1] हीन निर्मिता झाला
अंगातें झिजवुनिया तरि हरि तो धन्य अन्यतापाला[2] ॥३३॥

दिंडी.

मूल वेष्टिति चंदना! तव भुजंग
तुझ्या शिखरावरि विहरती विहंगें[3]
उडति शाखांवरि चहुंकडे प्लवंग[4]
न जनिं ओढत[5] कोणतें तुझें अंग? ॥ ३४ ॥

व. ति.

गंधें तुझ्या हरियलें अमुच्या मनाला
आलों समक्ष म्हणुनी तव दर्शनाला
क्रोडीं[6] भुजंग दिसती तंव हे विशाल
येतों अह्मी, मलयजा[7]! असें[8] तूं खुशाल[9] ॥ ३५ ॥

## कस्तूरिकान्योक्ति.

व. ति.

मद्गंधसा[*] त्रिभुवनांत दुजा न गंध
चित्तांत हें धरुनि झालिस तूं मदांध
त्यासाठिं[10] हानि करिशी अपुल्या पित्यांची[11]

---

१ फळें आणि फुलें यांनीं रहित. २ परकीयांच्या संतापाला. ३ पक्षी. ४ वानर. ५ अंगीकारिलेलें, घेतलेलें. ६ ढोलींत ७ अगा चंदना! ८ ऐस, रहा. ९ सुखरूप. * माझ्या वासासारखा. १० त्या गंधासाठीं. ११ बापाची. एका विशेषप्रकारच्या हरिणाच्या नाभींत कस्तूरी सांपडते. त्या हरिणाला कस्तूरीमृग असें ह्मणतात. त्या कस्तूरीमृगाला मारून त्याच्या नाभींतून कस्तूरी काढून घेतात. तेव्हां कस्तूरीचा जन्म तिच्या बापाच्या मुळावर झाला असें झालें! ही गोष्ट मनांत आणून कोणी एक गृहस्थ या पद्यांत वर्णिल्याप्रमाणें तिच्याशीं उपहासपूर्वक बोलत आहे.

कस्तूरिके! तुज न लाज तथापि त्याची! ॥ ३६ ॥

## आम्रफलान्योक्ति.

व. ति.

स्वर्णासमान तव कांति विराजमान
गंधास तेविं रुचिला हि जनांत मान
आम्रा! तुझें हृदय[1] मात्र कठोर, हाय!
हें शोभतें वद तुझ्या महतीसे[2] काय? ॥ ३७ ॥

## इक्ष्वन्योक्ति.

शिखरिणी.

परासाठीं पीडा[3] सहन करुनी कंठि दिवस
तनू भंगी[4] पावे तरि हि वितरी[5] स्वादुचि रसें[6]
*जयाच्या लोकांना विकृति[7] रुचती त्याहि सकळ
अहा! त्या इक्षूचा[8] खचित गमतो जन्म सफळ! ३८॥

## चंद्रान्योक्ति.

व. ति.

चंद्रा! सखा ह्मणविशी जनिं मन्मथाचा[9]
तद्वैरियीं[10] प्रणयें[11] दाविशि तेविं साचा
विश्वासपात्र[12] तरि तूं असशी तयांचें[13]
हें तों निदर्शन[14] तुझ्या विमलान्तराचें[15]! ॥ ३९ ॥

---

१ काळीज, अर्थात् कोय. २ मोठेपणास. ३ चरकांतील दाब, विरोधपक्षीं त्रास. ४ कांड्याच्या रूपानें परिणामाप्रत; विरोधपक्षीं नाशाप्रत. ५ देतो. ६ मधुर द्रव, विरोधपक्षीं प्रेम. *जयाच्या त्या सकळहि विकृति इ० अन्वय. ७ गूळ, साकर इ० प्रकार; विरोधपक्षीं विकृतरूप ८ उसाचा. ९ मदनाचा. १० शंकराला. ११ प्रेम. १२ विश्वासाचें ठिकाण. १३ मदन व शिव यांचें. १४ उदाहरण. १५ निर्मल मनाचें.

## कुंभान्योक्ति.

प्रहर्षिणी.

बा कुंभा! अडकवुनी गळ्यास फांस
जो कूपीं ढकलि तुला तया नरास
प्रेमें तूं सुखविशि जीवनप्रदानें[1]
हें कोठें व्रत शिकलासि कोण जाणे! ॥ ४० ॥

## दीपान्योक्ति.

मालिनी.

अयि जिवलग मित्रा! प्रेमपात्रा, प्रदीपा[2]!
हृदयिं धरुनि ठेवीं एक ही गोष्ट बापा
अनवरत[3] सुपात्रीं[4] स्नेहें[5] तूं पूर्ण राख
तव सकलगुणांची[6] अन्यथा[7] होय राख[8]! ॥ ४१ ॥

## सागरान्योक्ति.

द्रु. वि.

स्वगुरुतागुरुगर्व[9] नव्हे बरा
लघु तुझ्यासम अन्य न सागरा!
जवळि तूं असतां दुसरीकडे[10]
तृषित नाविक[11] पाहति बापडे! ॥ ४२ ॥

आर्या.

तृण शिरिं[12] धरिशी, देशी स्थल रत्नां[13], अर्णवा[14]! पदाजवळीं
तृण तें तृण रत्नहि तें रत्न, वृथाश्रम तुझ्या मना कवळी ४३

---

१ पाणी देऊन; श्लेषानें जीव देऊन. २ दिव्या. ३ एकसारखें. ४ चांगल्या ठिकाणीं; न गळणाऱ्यापात्रांत. ५ प्रेम; तैल. ६ गुणांची; वातींची. ७ नाहींतर, ८ माती, राख. ९ आपल्या मोठेपणाची मोठी घमेंड. १० नदी, सरोवर, कूप इत्यादिकांकडे. ११ नावाडी. १२ डोक्यावर. १३ रत्नांना. १४ हे समुद्रा!

## कूपान्योक्ति.

आर्या.

मी परम[1] नीच ऐसें समजुनि कूपा! करीं न खेद मनीं
अतिसरसहृदय[2] तेवीं असशी अतिचतुर परगुणग्रहणीं[3] ॥४४॥

## दुग्धान्योक्ति.

आर्या.

तप्त[4], विकृत[5], मंथित[6] तरी प्रकट करी स्नेह[7]! हें असें कवण।
त्या शुद्ध[8]मधुरदुग्धावांचुनि दावी जनांत थोरपण ॥ ४५ ॥

## तडागान्योक्ति.

शा. वि.

तापानें रविच्या सुकोनि सगळें जाईल माझें जळ
कोठें जातिल तेधवां पथिक हे संतापदुःखाकुल
चिंतेनें झुरतें सरोवर अशा, प्राणान्तही[9] पावतें !
त्याचें जीवन[10] धन्य! अन्य लटिकेची[11] जीवनाधार[12] ते ॥४६॥

## शंखान्योक्ति.

कनकमंजरी.

लवण[13]जीवनीं जन्म, वक्रता[14]

---

१ अधम. २ अत्यंत प्रेमयुक्त अंतःकरण ज्याचें असा. ३ दुसऱ्याच्या अंगचा गुण घेण्याविषयीं. नीच, रस, हृदय आणि गुण यांचे अनुक्रमें खोल, उदक, अंतःप्रदेश आणि दोरखंड असे दुसरे अर्थ आहेत त्यांवरून श्लेष व्यक्त होईल. ४ तापविलेले; विरोधपक्षीं संतापयुक्त केलेलें. ५ दही, लोणी इत्यादि विकारांप्रत पावलेलें; विरोधपक्षीं विरूप केलेलें. ६ घुसळलेलें; विरोधपक्षीं ताडन केलेलें. ७ तूप; विरोधपक्षीं मैत्री. ८ पवित्र, निर्मल. ९ नाश पावतें; जीवनरहित होतें. १० पाणी; श्लेषानें जीवितही. ११ खोटें, व्यर्थ. १२ जलसंचय. १३ खाऱ्या पाण्यांत. १४ कुटिलपणा, वांकडेपणा.

काठिनता तशी आं*त शू[१]न्यता
असुनि, शंख, हें सर्वही उणें
ह[२]रिकरीं वसे कोणत्या गुणें ? ॥ ४७ ॥

## नागवल्यन्योक्ति.

व. ति.

लोकोपकार निज[३]पत्रफलीं करीती
वे[४]ल्ली अशा किति तरी जगतींत होती !
ती ना[५]गवल्लि परि फार तयांत साजे
रामा[६]मुखेन्दु रमणीय तिनें विरा[७]जे ! ॥ ४८ ॥

## सुवर्णान्योक्ति.

पृथ्वी.

घणावरि घण, प्र[८]भो ! जन हणी शरीरावरी
पुनः पुनरपी मला ढकलि अग्निकुंडान्तरीं
करी विकृत रूपही, सकल दुःख हें साहवें
परी मज न गुं[९]जिकातुलन मात्र तें पाहवें ! ॥ ४९ ॥

## सुवर्णकारान्योक्ति.

व. ति.

फिरुनि फिरुनि मातें ता[१०]पें देतोसि फार
कधिं न करिशि चित्तीं स्व[११]र्णकारा ! विचार
अधिक अधिक माझें तेज तेणें विकासे
परि तव वदनाला काळिमा मात्र फासे ! ॥ ५० ॥

---

*हृदयांत १ पोकळपणा; अर्थात् प्रेमादिकांचा अभाव. २ विष्णूच्या हातांत. विष्णूच्या आयुधांपैकीं शंख एक आयुध आहे. ३ आपल्या पानांनीं व फळांनीं. ४ वेली. ५ नागवेल. ६ स्त्रियांचा मुखचंद्र. ७ विशेष रंगतो. ८ ही सुवर्णाची परमेश्वराला प्रार्थना आहे. ९ गुंजेनें तोलणें. १० संताप अर्थात् आंच. ११ सोनारा.

## करुणविलास.

व. ति.

हा हाय ! दृष्टि विधिनें अतिवक्र केली
प्राणेश्वरी त्यजुनिया मज दूर गेली !
कोणास हृद्गत अतां कथिशील चित्ता ?
कोण स्वमंजुवचनीं तव वारि चिन्ता ? ॥ १ ॥
येतां गृहीं, पुढति येउनि संभ्रमानें
आनंदवीशि सरससस्मितवीक्षणानें
ती तूं सुधामधुर शब्द वदोनि आजी
कां तापशांति लवही करिशी न माझी ? ॥ २ ॥
माझ्या करा धरुनि, भीरु ! पुरा विवाहीं
यत्नें शिलाशकलिं तूं चढलीस पाहीं !
तो स्वर्गमार्ग चढशी, असहाय ! आजी
तेणें उले हृदय, भंगुनि धीरता जी ! ॥ ३ ॥
चिंता सरोजमनिंची सगळी निवाली

---

टि० १ एका विलासी गृहस्थाची प्रियपत्नी एकाएकीं मरण पावली. तेव्हां तो गृहस्थ तिच्याकरितां विलाप करूं लागला. तो विलाप या पद्यांचा विषय आहे. २ अगा मना ! ३ आपल्या गोड शब्दांनीं. ४ दूर करील. ५ घराला (मी) आलों असतां. ६ लगबगीनें (माझ्या) पुढतीं येउनि इ. अन्वय. ७ (जी तूं) आनंद देत होतीस. ८ सप्रेममंदहास्ययुक्त दृष्टीनें. ९ अमृतासारखे गोड. १० दुःखशमन ११ हाताला. १२ भित्रे. १३पूर्वी. १४लग्नाच्या वेळीं. १५ सहाणेवर. लग्नामध्यें वधूला सहाणेवर उभी करण्याचा एक संस्कार आहे त्याला अनुलक्षून हें वर्णन आहे. १६ ती अतिशय उंच व अवघड स्वर्गाची वाट. १७ एकटी. १८ उलून जाते, विदीर्ण होते. १९ धैर्य. *हे प्रिये ! २० कमळाच्या मनांतली. २१ शांत झाली; दूर झाली.

झालें विशेष विधुबिंब[1]हि कांतिशाली[2]
केला सुरू कलकलाट तसा पिकांनीं[3]
गेलीस तूं इथुनि हें परिसूनि कानीं ॥ ४ ॥

निर्दूषणा[4], गुणवती[5], रसभावपूर्णा[6]
सालंकृति[7], श्रवणकोमलकांतवर्णा[8]
अत्यंत रम्य कवितेसम[9] माझिया जे[10]
कान्ता त्यजी हृदयमंदिर हें न माझें ॥ ५ ॥

नानाविचित्रविषयस्मृति ही बुजाली[11]
विद्या श्रमार्जित[12] पराङ्मुख तेविं झाली
ती मात्र एक विलसे अधिदेवतेशी[13]
सारंगबालनयना[14] हृदयप्रदेशीं ॥ ६ ॥

निर्वाणमंदिरिं[15] जवें[16] शिरतां दयाही
त्वां सोडिलीस सदये! कृति योग्य कां ही?

---

१ चंद्राचें बिंब. २ कांतीनें शोभणारें. ३ कोकिलांनीं. ४ दोषरहित; कांतापक्षीं शारीरिक किंवा मानसिक कोणतेंही व्यंग त्यानें रहित; कवितापक्षीं श्रुतिकटुता, ग्राम्यता, अनुचितार्थता इत्यादि दोषांनीं रहित. ५ कांतापक्षीं पातिव्रत्यादि गुणांनीं युक्त; कवितापक्षीं प्रसाद, माधुर्य आणि ओज या काव्यगुणांनींयुक्त. ६ कांतापक्षीं पतिविषयक प्रेम व निष्ठा यांनीं परिपूर्ण; कवितापक्षीं शृंगार, वीर इ० रस व या रसांचा परिपोष करणारे रति, हास्य, निर्वेद, ग्लानि इत्यादि भाव यांनीं परिप्लुत. ७ कांतापक्षीं भूषणांनींयुक्त; कवितापक्षीं शब्दार्थालंकारांनीं युक्त. ८ कांतापक्षीं कर्णमधुर सुंदर ध्वनि आहे जिचा अशी; कवितापक्षीं कर्णमधुर, सुंदर वर्णरचना जिची अशी. ९ कवितेसारखी. १० जी कांता. ११ नाहींशी झाली. १२ श्रमानें प्राप्त करून घेतलेली (विद्या). १३ मुख्य देवतेसारखी. १४ हरिणबालकाप्रमाणें आहेत नेत्र जिचे अशी. १५ मोक्षमंदिरामध्यें १६ वेगानें, गर्दीनें.

आतां [१]त्वदीय नवपंकजगर्वहारी
[२]प्रेमप्रपूरितकटाक्ष न [३]ताप [४]वारी ॥ ७ ॥
[५]विद्युत्प्रभातरल [६]राजविलासभोग
देवोनिया घडविशी सहसा वियोग!
[७]मंत्रच्युता त्यजुनि जाय [८]रमा नृपाशी
तूं भाग्यहीनपति सोडुनि तेविं जाशी ॥ ८ ॥
झाली सुरम्य जगती तव [९]मंजुहासें
तेणें जिची[१०] [११]विफलता कविलागि भासे
ती पूर्णिमा परिसुनी तव [१२]दुर्दशेचें
वृत्त, स्वतां मिरवि वैभव [१३]इंदिरेचें! ॥ ९ ॥
[१४]मंदस्मितामृतभरें [१५]अभिषिंचियेलें
[१६]उत्फुल्लनेत्रकमलीं मज पूजियेलें
ती [१७]नित्य मंगलमयी [१८]गृहदेवता ही
प्राणेश्वरी हृदय सोडुनि जात नाहीं! ॥ १० ॥
[१९]कर्पूरवर्तिसम दे [२०]नयनोत्सवाला
कंठास ही सुखवि जेविं [२१]नवाब्जमाला

---

१ ताज्या कमळाचा गर्व हरण करणारा. २ प्रेमानें ओतप्रोत भरलेला कटाक्ष. ३ दुःख. ४ दूर करी. ५ विजेच्या प्रकाशाप्रमाणें क्षणभंगुर. ६ राजविलासांचा उपभोग. ७ सदुपदिष्ट मार्गापासून भ्रष्ट अशा (नृपाशी). ८ लक्ष्मी. ९ मधुर हास्यानें. कवि हास्याचा रंग शुभ्र मानतात. १० ज्या पूर्णिमेची. ११ व्यर्थपणा १२ मृत्यूचें. १३ लक्ष्मीचें. १४ मंदहास्यरूप अमृताच्या संचयानें. १५ अभिषेक केला. १६ प्रफुल्लित अशा नेत्ररूप कमलांनीं. १७ सर्वदा मंगलयुत. १८ घरांतील देवी. ती ही नित्य मंगलमयी गृहदेवता प्राणेश्वरी इ० अन्वय. १९ कापराच्या वातीप्रमाणें. २० नयनानंदाला. २१ ताज्या कमळांची माळ.

उल्हासवी[१] सुकवितेसम[२] जी[०] *मतीशी
स्त्रीवंद्य[३] ती विलसली सुरसुंदरीशी[४] ॥ ११ ॥
सौंदर्य अप्रतिम, शील तसें उदार
शालीनता[५] रुचिर, वर्तन शुद्ध फार
या सर्व आश्रयविहीन[६] गुणां, मलाही
टाकोनि जाशि ! करुणा तुज काय नाहीं ॥ १२ ॥
माझ्याकडोनि घडला अपराध कांहीं
तेणें मनामधिं अढी धरिलीस कां ही ?
नोहे तरी मजसि टाकुनि मुक्तिगेहीं[७]
जाणें अशक्य तुज गोष्ट, पतिव्रते[८] ! ही ॥ १३ ॥
संबोधुनी[९] रमण[१०] ! नाथ[११] ! अशा पदांहीं
स्वर्गासमान मज भासविली धरा[१२] ही
स्वर्गस्थ[१३] होउनि अतां मज येथें[१४] काय
धूळींत लोळविशि मानिनि[१५]! हाय हाय ! ॥ १४ ॥

---

१ आनंद देई. २ चांगल्या कवितेसारखी. ० जी कांता. * बुद्धीला. ३ स्त्रीजातीला वंद्य. ४ देवांगनेप्रमाणें. ५ नम्रपणा. ६ आधाररहित, निराश्रय. तूं स्वर्गाला गेल्यामुळें हे सर्व गुण उघडे पडले. त्यांना समुच्चयानें राहण्याला दुसरें ठिकाण येथें दिसत नाहीं आणि मलाही अनन्यगतिकत्वामुळें येथें दुसरा आधार राहिला नाहीं असा भाव. ७ मुक्ति ह्मणजे मोक्ष. मुक्तिशब्द स्त्रीलिंगी असल्यामुळें त्यावर येथें सखीची कल्पना ध्वनित झाली आहे. प्रणयकोपप्रसंगीं नायक अनुकूल होईपर्यंत नायिका आपल्या सखीच्या घरीं रहावयाला जाते; हा भाव मनांत धरून विरही आपल्या प्रियेला उद्देशून बोलत आहे. ८ पति हेंच व्रत जिचें असे स्त्रिये ! ९ हांक मारून. १० हे रमणा ! ११ हे नाथा ! १२ ही पृथ्वी. १३ स्वर्गवासी होऊन. १४ या पृथ्वीवर. १५ हे मानवति स्त्रिये !

# बोधलहरी.

## अश्वधाटी.

कां मानवा ! हृदयिं कामां[1] धरूनि जन[2]धामांस धुंडिशि जनीं?
दा[3]मांस दैवताचि वा! मानुनीहि पर[4]वामांस वांछिसि मनीं
हा मार्ग वा[5]म, वद, सामा[6]न्यलोकनुत, कां मान्य होय तुजशी?
रामाविणें कवण कामास येई तुज? कां मा[7]त ही विसरशी? ।१।
मारावयासि अवतारा धरीं भुवनिं त्या रावणास, मनुजा!
ता[9]राधिपद्युति, उदारा, व[10]रा, प्रथित[11], दारा ज[12]या जनकजा[13]
तारावया सुजन सारा समर्थ बहु वारावयास विपदा
त्या राघवा त्यजुनि कां राहतोसि भवका[14]रागृहांतरि सदा ।२।
मंदारवृक्ष[15]युतवृंदावनीं रमुनि नंदा[16]स नंदित[17] करी
वृंदा[18]रकां सुजन[19]वृंदासही परमा[20]नंदा सदैव वितरी[21]
मंदा[22]! दुजा त्यजुनि धंदा, असा[23] अळविं वंदारुवंदित[24] हरी
छंदासि या धरिशि, खंदा[25] तरी न नर[26]वृंदांतरीं तुजपरी ॥ ३॥
आचार तूं त्यजिशि, वाचालता करुनि, नाचावयास शिकशी

---

१ मनोरथांना. २ लोकांच्या घरांना. ३ पैशाला. ४ परस्त्रियांना. ५ विपरीत. ६ साधारण लोकांनीं स्तविलेला, अर्थात् घेतलेला किंवा पतकरलेला. ७ गोष्ट. ८ त्रैलोक्यप्रसिद्ध अशा. ९ चंद्राप्रमाणें आहे कांति जिची अशी. १० उत्कृष्ट, कुलीन. ११ प्रसिद्ध. १२ ज्या रामचंद्राला. १३ जानकी. १४ संसाररूप बंदिवासांत. १५ मंदारवृक्षांनीं भरलेल्या वृंदावनांत. १६ नंद नांवाच्या पित्यास. १७ आनंदित, १८ देवांना. १९ साधुसमुदायाला. २० मोठ्या आनंदाला. २१ देतो. २२ हे मतिमंदा नरा! २३ वरील लक्षणांनीं युक्त. २४ स्तवन करणाऱ्या जनांनीं वंदिलेला. २५ शूर, कर्ता, २६ मानवसमाजांत. धंदा, खंदा इत्यादि शब्द यावन असतांही शब्दचमत्काराकरितां त्यांचा येथें स्वीकार केला आहे.

याचा विचार तरि साचा कधीं, नरपिशाचा[1] ! मनांत करिशी ?
काचा करीं धरुनि पाचो[2] दुरी करिशि, लाचार[3] होशि भुवनीं
वांचावयास भवकांचांतुनी स्थिरवि[4] वाचो[5] मुकुंदभजनीं ॥४॥
वायां किमर्थ नरकाया[6] अमोल, नरराया ! अगा, दवडिशी
जायास सोय परठाया[7] असे इतर कां या जगामधिं अशी
घार्या[8] करोनि रिपु जाया[9] तिला करिल खाया उठेल, सखया
जांया[10] पळेल दुरिं, बा ! या प्रसंगिं धरिं पायांस तूं हरिचिया॥५
हालाहला[11] पिउनि धाला[12] सदैव कलिकालास[13] दूर पळवी
व्यालां[14] करांत, विधु[15] भालांतरीं[16], नरकपालांस[17] कंठिं मिरवी
त्या लागि ओळखुनि झालासि नम्र तरि, बा ! लागलींच तरशी
माळा गळां, अगरु[18] भाळा, कळो[19] विफळ, काळासि कां दवडिशी ?
साधावया स्वहित साधा[20] उपाय तुज बाधावनांत[21] न दुजा
राधाप्रियज्वलन[22] आधार, त्याजवळिं बा ! धांव मार, मनुजा !
भावो[23] धरोनि मनिं धावा करीशि जरि नांवास घेउनि तरी
पावावया अधिर[24], पावा[25] धरोनि मुखिं, बा ! वामने[26] प्रभु हरी ॥७
कामादि थोर रिपु सा[27] मातले, मथुनि त्यां, मानवा ! वश करीं
कामास या करिशि, भामापती[28] तरि विरामार्थ[29] ये +तव करीं

---

१ नररूप पिशाचा ! २ पाच नांवाच्या मूल्यवान् मण्यांना. ३ दीन. ४ स्थिर कर. ५ वाणी. ६ नरदेह. ७ स्वर्गास, अर्थात् मोक्षास. ८ आघातास. ९ जखमी. १० स्त्री, पत्नी. ११ या नांवाच्या विषाला. १२ संतुष्ट झालेला. १३ कलीला आणि काळाला. १४ सर्पांना. १५ चंद्र. १६ कपाळावर. १७ नरांच्या कवट्यांस. १८ चंदन. १९ या सगळ्या करामती व्यर्थ आहेत. २० सोपा. २१ बाधारूप अरण्यांत. २२ कृष्णरूप अग्नि. २३ प्रेमा. २४ उत्कंठित. २५ मुरली. २६ बालवयस्क ( मुरलीधर श्रीकृष्ण ). २७ सहा. २८ विष्णु. २९ विसावा घेण्याकरितां. + तुझ्या हातांत येऊन राहील.

शंका मनीं न धरिं, [1]रंकावनीं कुशल, [2]लंकाधिपारि भज, [5]गा!
संसार हा विफल, [3]हंसाश्रमी बनुनि [4]कंसारिचेंचि यश गा ॥८॥

## यमुनागीत.

पृथिवी

[6]कालिंदनगकन्यके! बमुनिया प्रभातीं तटीं
विलोकि नर जो तुझी क्षणभरीं तनू [7]गोमटी
अये! हृदयिं त्याचिया प्रगट होतसे साजिरी
[8]रमारमणमूर्ति, जी [9]नवपयोदशोभा वरी[10] ॥ १ ॥

शा. वि.

माते! [11]पातकपातकारिणि! तुझ्या नीलांबुची थोरवी
वानायास समर्थ कोण जगतीमाजी असे तो [12]कवी
भक्तीनें तुझिया जलांत जननि! स्नानादि जो [13]आचरी
स्वर्गीं ढाळिति चामरें करतलीं स्वर्गांगना त्यावरी ॥ २ ॥

मालिनी.

[14]स्फटिकधवल, [15]आई! [16]अंतरंगीं विराजे
वरुनि [17]वरि [18]महेन्द्रश्यामशोभा पहा जें
विमल, सुरभि, तेवीं पातकध्वंसकारी
[20]हरिहराचि करोनी टाकि तें दिव्य वारी[21] ॥ ३ ॥

व. ति.

जेथें मदांध झुलती [22]गजवाजिराजी

---

१ दीनांचें रक्षण करण्याच्या कामीं. २ रावणाचा शत्रु, अर्थात् रामचंद्र. ३ संन्यासी. ४ कृष्णाचें. ५ गात रहा. ६ हे कालिन्दि! हे यमुने! ७ सुंदर. ८ विष्णुमूर्ति. ९ सजलमेघाची कांति. १० धारण करिते. ११ पातकांचा नाश करणारे. १२ पंडित. १३ करी. १४ स्फटिकासारखे पांढरे. १५ हे आई. १६ आंतल्या बाजूला. १७ धारण करिते. १८ महेंद्रपर्वताची नीलकांति. १९ जें वारि. २० हरीचा वर्ण श्याम आहे व हराचा शुभ्र आहे या प्रसिद्धीकडे येथें लक्ष आहे. २१ पाणी. २२ हत्ती व घोडे यांच्या रांगा.

द्वारा तया नृपतिच्या नति[1] आज माझी
जावोत हे दिन तुझ्या, यमुने ! तटोकीं[2]
ज्यां[3] भूषवोनि फलपल्लव[4]कान्ति टाकी* ॥ ४ ॥

शा. वि.

पापें तोंवरि भोंवतीं विचरती[5] मृत्यू करी व्याकुल
ज्वालांनीं तनु जाळितो निशिदिनीं संसारदावानल[6]
कामक्रोधमदांचिया उसळती लाटा तशा अंतरीं
नाहीं देखियला प्रवाह, यमुने ! नेत्रीं तुझा जोंवरी ॥ ५ ॥

---

## हिमालयवर्णन.

साकी.

असे उत्तरेकडे हिमालय नामक तो गिरिराज[7]
वंद्य देवतारूप तयाला नमन असो मम आज ॥ १ ॥
पूर्वापरजलनिधीमधें[8] तो प्रवेश करुनी राहे
जणो पृथिविला मोजायाचा दण्ड[9]चि पडला आहे ! ॥ २ ॥
हिरे अमोलिक, रत्नें सुंदर, रम्य शिलांचे खंड
मंडित करिती नगराजाला ओषधि तेविं उदंड[10] ॥ ३ ॥
हिम[11]नगतनुची कांति हिम[12]वेशें उणी अणुहि नचि होय
एक दोष गुण[13]गणीं अंक[14]सा विधु[15]करिं लोपुनि जाय ॥ ४ ॥

---

१ नमस्कार. २ तीरावर. ३ ज्या तीराला. ४ फळें आणि पाला यांची शोभा * ज्या फलपल्लवकांति भूषवोनि टाकी असा अन्वय. ५ फिरतात. ६ संसार हा वणवा. ७ पर्वतांचा राजा. ८ पूर्व आणि पश्चिम या दिशांकडे असणाऱ्या समुद्रांमध्यें. ९ हात. १० अनंत. ११ हिमालयाच्या शरीराची. १२ बर्फाच्या योगानें. १३ गुणसमुदायांत. १४ कलंकाप्रमाणें. १५ चंद्रकिरणांत.

सिंदूरादिक धातु तयाच्या शिखरावरि असतात
प्रभा तयांची बिंबुनि अंतरिं मेघ अरुण दिसतात ! ॥ ५ ॥
संध्याकाळचि झाली ऐसी भ्रांति तदा होवोनी
सिद्धसुंदरी नटति संभ्रमें अलंकार लेवोनी ॥ ६ ॥
रम्यगुहांतरिं वनितासंगें विहरति तेथ किरात[1]
ओषधि तैलाविण रात्रीं त्यां सुरतदीप[2] होतात ! ॥ ७ ॥
मत्तमतंगज[3] गंडें[4] घासिती कंडू शमवायास
देवदारुवरि[5] तेथें त्यांतुनि निघे बहुत निर्यास[6] ॥ ८ ॥
त्याचा परिमल[7] पवन पसरवी मंदमंद वाहोनी
शैलेंद्राचीं शिखरें टाकी सुगंधपूर्ण करोनी ॥ ९ ॥
सूर्यापासुनि रक्षि गुहांतरिं[8] लीन[9] तिमिरें[10] घनघोर[11]
येतां शरण क्षुद्रहि त्यातें अपुला समजति थोर[12] ! ॥ १० ॥
निवारिते* हृतवसन[13]किन्नरीलज्जा तेथ घनाली[14]
दैवगतीनें दरीगृहाच्या द्वारावरि जी[15] आली ॥ ११ ॥
भागीरथिचे विमल[16]शिशिरजलबिंदु हरि प्रेमानें
देवदारुतरु डोलवि अपुल्या मंदमंद गमनानें ॥ १२ ॥
मृगया करितां शीण जाहला व्हावा लवकरि शांत

---

१ भिल्ल, कोळी. २ रतिप्रसंगींचे दीप. ३ उन्मत्त हत्ती. ४ गंडस्थलें. ५ देवदारुवृक्षावर. ६ रस, चीक. ७ सुगंध. ८ गुहेच्या उदरांत. ९ दडून बसलेला. १० अंधकार. ११ निबिड, घन, दाट. १२ थोर लोक * दूर करते. याचा कर्ता 'घनाली' व कर्म 'हृत ... लज्जा.' १३ (प्रियांनीं) ओढून नेलीं आहेत वस्त्रें ज्यांचीं अशा किन्नरस्त्रियांची लाज. १४ घनपंक्ति. १५ जी घनाली. १६ पवित्र आणि थंड असे पाण्याचे थेंब. हें 'हरि' याचें कर्म. 'हरि' व 'डोलवि' यांचा कर्ता 'जो ( पवन )' हा अध्याहृत आहे.

ह्मणुनि पवन हा असा सेविती मोदें तेथ किरात ॥ १३ ॥
ज्योत्स्नाधवळें[1] धरिति चामरें त्या गिरिवरि वनगाई
शैलराज[2] हें नांव तयानें सार्थकते[3]प्रति जाई ! ॥ १४ ॥
भरी दरीमुख[4]समीरणानें रंध्रें[5] तो वंशांचीं[6]
गानसमयिं जणुं साथ कराया इच्छी गंधर्वांची ! ॥ १५ ॥

---

## करुणालहरी.

द्रु० वि०

प्रभुवरा ! शरणागतवत्सला[7] !
करुनिया करुणा सुखवीं मला
तव पदीं अतिदीन[8], रमावरा[9] !
विनत[10] मी, न तमीं[11] भ्रम[12] हा बरा ॥ १ ॥
शुभंकरा[13] ! उपलां[14] असु[15] अर्पिशी
उपलसेतुहि[16] सागरिं तारिशी

---

१ चांदण्याप्रमाणें शुभ्र अशीं. हें ' चामरें ' ( चवऱ्या ) या पदाचें विशेषण. २ पर्वतांचा राजा. ३ राजचिन्हांपैकीं चामर हें एक चिन्ह आहे. वनगाई आपलीं पुच्छरूपी चामरें हिमालयावर ढाळतात त्यामुळें शैलराज हें त्याचें नांव यथार्थ होत आहे असा भाव. ४ गुहारूपी जें तोंड त्यांतील वाऱ्यानें. ५ भोकें. ६ वेळूंची. वेळूच्या छिद्रांमध्यें दरींतला वारा शिरून त्यांतून नाद निघत असतो या चमत्काराला अनुलक्षून येथें कल्पना केली आहे. ७ शरण आलेल्या जनाविषयीं प्रेमयुक्ता. ८ अति दीन मी तव पदीं विनत असा अन्वय. ९ लक्ष्मीपते ! १० नम्र. ११ भवांधकारांत. १२ भटकणें. १३ कल्याण करणाऱ्या ! १४ दगडाला. येथें अहिल्योद्धाराकडे लक्ष आहे. १५ प्राण. १६ दगडाचा पूल ( लंकेला जातांना बांधलेला ).

तव चमत्कृतिकारि[1] दिसे जनां
विभव[2] हें, भव[3]हेतुविभंजना ! ॥ २ ॥

मन असे अतिचंचल, नाचवी
तव यशःस्तवनीं धरिना चवी[4]
'करिन मी स्थिर त्यास' अशा वरा[5]
वितरिशी[6] तरि शीघ्र गती[7], हरा[8]! ॥ ३ ॥

अनुदिनीं उपदेश करी गुरू
तरि कथा पहिलीच असे सुरू
तव कथामृत टाकुनि पामरें[9]
पुनरपी नर पी भव[10] हा गरें[11]! ॥ ४ ॥

श्रुतिकथा[12] सुपथाप्रति दाविती
सुजन आचरणें उपदेशिती
गुरुजन प्रणयें[13] हितें* सांगती
परमतीं[14] रमती[15] न तरी मति[16] ॥ ५ ॥

मम मना धनवैभव लोभवी
बहुत त्याकारितां भ्रमलों भवीं[17]
स्वहृदयीं परमादर दावितों
कवडिला[18], वडिलांहि न तेविं तो[19] ॥ ६ ॥

सकल[20]शास्त्रविशारद जो नर
करुनि टाकि तयासहि पामर

---

१ विस्मय उत्पन्न करणारें. २ ऐश्वर्य; हें तव विभव जनां चमत्कृतिकारि दिसे असा अन्वय. ३ हे संसारबाजनाशका! ४ रुचि, आवड. ५ प्रसादाला. ६ देशील. ७ मोक्ष. ८ हे शंकरा! ९ मूर्ख (नर) १० संसार. ११ विष. १२ वेदांतील कथा. १३ प्रेमानें. *हिताची गोष्ट. १४ उत्कृष्ट मताच्या ठिकाणीं. १५ रममाण होते. १६ बुद्धि. १७ संसारांत. १८ कवडिला परमादर दावितों इ० अन्वय. १९ परमादर. २० सगळ्या शास्त्रांत निपुण.

अमित बाहुबलें मथि[1] जो अरी[2]
नरमणी[3], रमणीजित[4] त्या[5] करी ॥ ७ ॥
प्रबल काम असा अरिंच्या गणीं[6]
फिरवितो मजलागि जनीं वनीं
सतत पीडितसे मम मानसा[7]
दुरवि[8] तो; रवि थोर तमा[9] जसा ॥ ८ ॥
इतर[10] ही छळिती परमेश्वरा!
रिपु मला तुझिया लघु लेंकरा
तुज असे शरणागत अंतरीं
मज न कां? जनका[11]! बघशी तरी? ॥ ९ ॥
त्रिभुवनांत नसे तुजवांचुनी
किमपि, बोलति मात्र असें जनीं
विविध पंथ, सख्या! परि माजले
चरण[12] कां रणकारण[13] जाहले? ॥ १० ॥
झगडती, जनका! अरि हे सहा
भ्रमवुनी भवजालिं[14] मला पहा
तव दयामृत[15] इच्छि दयालया[16]!
सकल हा कलहाग्नि[17] शमविया[18] ॥ ११ ॥

---

१ मथन करितो. २ शत्रूंना. ३ नरश्रेष्ठ, वीर. ४ बायकोनें जिंकलेला असा. ‘ करुनि टाकि ’ आणि ‘ मथि ’ यांना जो ( काम ) हा अध्याहृत कर्ता. ५ वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें पंडितांना पामर करणारा व वीरांना रमणीजित करणारा. ६ समुदायांत. ७ मनाला. ८ दूर कर, पळीव. ९ अंधकाराला. १० इतर रिपु असा अन्वय. ११ हे पित्या! १२ (तुझे) पाय. १३ युद्धाला हेतु. १४ भवरूप जाळ्यांत. १५ दयारूप जल. १६ दयानिधे! १७ कलहरूप अग्नि. १८ शांत करावयाला.

तव पराक्रम जाणुनिया वर[1]
दर[2] मनीं धरितो अमरेश्वर[3]
नुति[4] करी कर जोडुनिया तुझी
सुरतती[5] रमती[6] चरणांबुजीं[7] ॥ १२ ॥
प्रणतसंकटिं[8] सत्वर धांवशी
विमल कीर्ति तुझी मिरवे अशी
सदय होउनि तारियलें जनीं
गजवरा[9], जवलाघव[10] दावुनी ॥ १३ ॥
परम मंगल नाम तुझें मुखें
वदविं, भंगुनि भंगुर हीं सुखें
लवहि शांति मला वितरी खरी
न ममता[11], मम ताप हरे! हरीं[12] ॥ १४ ॥
खल सदा सुजनां जनिं पीडिती
तदवनीं[13] तव संतत जागृति
द्रवुनि अंतरिं मारिशि धांव रे!
द्रुपदजा[14] पद ज्या समयीं स्मरे ॥ १५ ॥
सकललोकपिता म्हणती तुला
न महिमा तव जाणतसे तुला[15]
अखिलरक्षणिं दक्ष तुझ्या पदा
नत[16], नुता[17]! तनुतापहरा[18]! सदा ॥ १६ ॥

---

१ श्रेष्ठ. २ भीति. ३ इंद्र. ४ स्तुति. ५ देवसमुदाय. ६ रमतात. ७ पादकमळीं. ८ भक्ताच्या संकटकालीं. ९ गजेंद्राला. १० वेगाचें कौशल. ११ हें माझें तें माझें अशी बुद्धि; ममता मला खरी शांति लवही न वितरी ( देई ) असा अन्वय. १२ दूर कर. १३ त्यांच्या रक्षणाविषयीं. १४ द्रौपदी. १५ साम्य. १६ अखिलरक्षणिं दक्ष (अशा) तुझ्या पदा सदा ( मी ) नत असा अन्वय. १७ स्तुता! १८ तनूचा ताप हरण करणाऱ्या (परमेश्वरा)!

पवन[1], पावन[2], जीवन[3], आतप[4]
सतत सेवुनिया करिती तप
मुनि असे तुज पाहति लोचनीं
स्थिरमती[5], रमती तव चिंतनीं ॥ १७॥
मजसि संसृतिचें[6] भय वाटतें
सदुपादिष्ट[7] दिसे नचि वाट तें[8]
ह्मणुनि ' धांव अगा, करुणाकरा!
मज पहा,' जप हाचि दिसे बरा ! ॥ १८ ॥
तंवरि[10] दीनपणा, खलसंगती
जनन, मृत्यु, जरा, तशि संसृति
परमदीनसख्या ! करुणालया !
मजवरी जंवरी[11] न तुझी दया ॥ १९ ॥
न सुमती[12], न तप, श्रुत[13] ही न तें
धरितसे मम शील[14] विहीनते[15]
न यजनीं[16] रुचि[17], सोडावें, गा, मला
अचपला[18], चपलारुचिरांबरा[19]! ॥ २० ॥
दिनमणी[20] गगनीं[21] अगदीं फिका
विधुसि कोठुनि सुंदर चंद्रिका[22]!

---

१ वायु. २ अग्नि. ३ उदक. ४ ऊन. ५ स्थिर आहे मति ज्यांची असे होत्साते. ६ संसाराचें. ७ सज्जनांनीं उपदेशिलेली. ८ ती वाट. ९ धांव अगा इ० १० तोंपर्यंत. ११ जोंपर्यंत. १२ चांगली बुद्धि. १३ विद्या. १४ स्वभाव. १५ विशेषलघुतेला; हें ' धरितसे ' याचें कर्म. ' धरितसे ' याचा कर्ता ' शील. ' १६ यज्ञाविषयीं. १७ आवड. १८ मंद अशा; अचपला मला सोडावें इ० अन्वय. १९ विजेप्रमाणें सुंदर आहे वस्त्र ज्याचें अशा; पीतवसना ! २० सूर्य. २१ आकाशांत. २२ चांदणें.

सफल[1] काय असे[2] शिखिचें[3] जिणें[4] ?
न भगणा भग, नाथ ! तुझ्या विणें ॥ २१ ॥

जनकसा[9] सकलां जपशी[10] तरी
प्रगटलासि लहानचि* गोकुळीं
तुज न ओळखितां, सगळे[11], हरे !
व्रजप[12] ते जपते[13] तुज जाहले ! ॥ २२ ॥

भवन, हेम, मही, सुत, कामिनी
धरिं मनीं दवडीं दिनयामिनी[14]
परमदुर्गतिचा[15], जनका[16] ! असे
प्रभव[17] हा भव[18]; हाय ! करूं कसें ! ॥ २३ ॥

सकल काम[19] तुझे पुरवी हरी
सुमति देउनि दैन्यहि संहरी
ह्मणुनि त्यासचि तूं, अयि[20] मानसा !
कर गडी, रगडीं[21] भव हा कसा ॥ २४ ॥

गुरु जया बहु दुर्लभ लाभला
गुरुचि[22] लाभ तयाप्रति जाहला

---

१ फलयुक्त. २ असे काय ? असा अन्वय. ३ अग्नीचें. ४ जीवित. ५ नक्षत्रसमूहाला. ६ ऐश्वर्य. ७ हे स्वामिन्. ८ हें वरील प्रत्येक वाक्यांत अन्वित आहे. ९ बापासारखा १० सांभाळतोस*बालरूपानें ११ सगळे व्रजप असा अन्वय. १२ व्रजवासिश्रेष्ठ. १३ रक्षिते. १४ दिवस आणि रात्र; अहोरात्र. १५ मोठ्या अधोगतीचा; याचा संबंध ' प्रभव ' याकडे. १६ अगा बापा ! १७ उत्पत्तिस्थान. १८ हा संसार; हा भव परमदुर्गतिचा प्रभव असे असा अन्वय. १९ मनोरथ २० अगा मना ! २१ संसार हा रगडून टाक कसा ! २२ मोठा.

समजतो मनिं तो[1] गत[2]संशय
भवन हें वन, हेम[3] हि गोमयें[4] ॥ २५ ॥
सुजन सांगति[5], ‘ सेवुनि सत्पथा
मनुज हो! परिसा हरिच्या कथा
खचित[6] अस्थिर हें इथलें असे
विभव, हाँ[7]! भव[8]हानि करीतसे ’ ॥ २६ ॥
धरुनि भाव सुनिर्मल[9] मानसीं
रति[10] करीं तुझिया पद[11]सारसीं
तुजविणें दुसरें दिसतें न ज्यां[12]
जनें[13] कसा न कसां[14] उतरे तुझ्या? ॥ २७ ॥
[15]भवभुजंगम हा मज चावला
करिं धरीं दृढ मी तव पावलां
निजबळें तनु वेष्टुनि हा[16] किती
बल हरी! लहरी[17] तिस[18] खंडिती ॥ २८ ॥
उगिच नाचशि कां भुवनांतरीं
तुजसि लाभ घडे लघु कां तरी
विफल हा श्रम नातरि[19] कासया[20]

---

१ ज्याला गुरूचा लाभ झाला तो. २ नाहींसा झाला आहे संशय ज्याचा असा होऊन. ३ सोनें. ४ शेण. भवन हें वन हेम हि गोमय ( असें ) तो गतसंशय ( होत्साता ) मनीं समजतो असा अन्वय. ५ पुढील सगळा श्लोक याचें कर्म. ६ इथलें ( या लोकींचें ) हें विभव ( ऐश्वर्य ) खचित अस्थिर असे असा अन्वय. ७ हाय! ८ कल्याणाचा नाश. ९ अत्यंत निर्मल; हें ‘ भाव ’ याचें विशेषण. १० प्रेम. ११ पादकमळीं. १२ ज्या जनाला. १३ तो जन. १४ तुझ्या कसा ( कसोटीला ) कसा न उतरे? १५ संसाररूप सर्प. १६ भवसर्प. १७ विषयरूप लहरी. १८ तनूला १९ नाहीं तर २० कशाला?

स्मर, मना[1]! रमणासि[2] रमेचिया[3] ॥ २९ ॥
‘ अमुक द्या, मजला तमकें हवें ’
नचि दुजें घरिं बाईल[4] आठवे
रडति दीन गृहांतरिं लेंकुरें
कवण? बा! वनवास; अतां पुरे! ॥ ३० ॥
भुवनिं थोरपणा तव ठाउका
प्रभुवरा! सकलां नतसेवकां[5]
प्रणत मी तुजला बहु आळवीं
नृपतिता[6], पतितां[7] मज, दाखवीं ॥ ३१ ॥
प्रणय[8] अद्भुत दाविशि सेवकां[9]
मजवरी अतिनिष्ठुर देवें[10]! कां?
नरतुरंगम[11] सेविशि मावरा[12]!
स्मरसि कां? रसिका! यदुशेखरा[13]! ॥ ३२ ॥
कधिं न नाम निघे तव या[14] मुखें
तव कथामृतही नचि पीं फुंकें[15]
अहह! आठवली मज ही अशी
अवदसा; वद[16] साद्य[17] करी कशी? ॥ ३३ ॥
विमलतीर्थनिषेवण[18] राहिलें[19]
न नयनीं तव मूर्तिस पाहिलें

---

१ हें मना. २ प्रियाला. ३ लक्ष्मीच्या. ४ बायको. ५ नम्र सेवकांना. ६ अखिल नरांचें पालन करणारा या नात्यानें जें तुझें ऐश्वर्य आहे तें. हें ‘ दाखवीं ’ याचें कर्म. ७ पतित ह्म० पापी जो मी त्याला. ८ प्रेम. ९ भक्तांना. १० अगा देवा! ११ अर्जुनाचे घोडे. १२ लक्ष्मीपते! १३ यदुश्रेष्ठा! १४ या माझ्या मुखानें. १५ फुकाचें. १६ सांग. १७ याला ‘ ती ’ ( अवदसा ) हा अध्याहृत कर्ता. १८ पवित्रतीर्थांची सेवा. १९ करायचें राहिलें.

गुरुपदाप्रति अंतरलों हरे!
मज नसे जनसेवन[1] जाहलें! ॥ ३४ ॥

हृदयमंदिरिं[2] तूं वसशी सदा
परि न ओळखितां स्थलें तें कदा
कितिकें[3] धुंडिति पाद, रमावरा[4]!
जन वनीं, नवनीरदसुंदरा[5]! ॥ ३५ ॥

अमित[6] उद्धरिशी जनि पातकी
न गणती[7] मम होय तयांत[8] कीं!
सदय दृष्टि तुझी अजि काय याँ*
विसरली! सरली अथवा दया? ॥ ३६ ॥

हृदयिं बांधुनिया रतिरज्जुंनीं[9]
तुज न सोडिति बाहिर त्यांतुनी
बुधजनीं[10], भव[11] हा, करुनी असें[12]
चुकविला, कविलाघव[13] हें नसे ॥ ३७ ॥

मजसि हे सगळे अरि मारिती
तुजसमक्ष तरी तुज न क्षिती
लव हि ये न दया तुज अंतरीं
फुकट कां कटकीं[14] धरिशी करीं! ॥ ३८ ॥

---

१ लोकसेवा. २ हृदयमंदिर. ३ कित्येक; हें 'जन' याचें विशेषण. ४ लक्ष्मीपते. ५ नवीन मेघाप्रमाणें सुंदर दिसणाऱ्या! (रमावरा!) ६ असंख्य; याचें विशेष्य 'पातकी' ७ गणना. ८ त्या पातकी जनांत. * या मला. ९ प्रेमरज्जूंनीं. १० पंडित लोकांनीं. ११ हा संसार; हें 'चुकविला' याचें कर्म. १२ वरल्या दोन चरणांत सांगितल्याप्रमाणें ह्म० तुला आपल्या हृदयांत प्रेमरश्मींनीं बांधून ठेवून. १३ कवीची अत्युक्ति. १४ चक्राला.

स्तुतपदा ! विपदर्णव[2] आटवीं
त्वरित दग्ध करीं विषयाटवी[3]
सुख अनश्वर[4] अंतरिं सांठवीं,
भवें[5] मना[6] वमनांसम[7] वाटवीं ॥ ३९ ॥

तव पदें विमलें मज दाखवीं
तव दयामृत अद्भुत चाखवीं
वदविं नाम मुखें तव मंगल
मग मला गमला[9] भव निर्बल ॥ ४० ॥

न[10] कळतां मम शैशवें[11] संपलें
विहरतां नव यौवन चाललें
करुनिया स्थिर चित्त कसें[12] बसें
पदिं नमीं, दिन मी गमवूं कसे ! ॥ ४१ ॥

नरतनू रुचिराकृति लाभली
जनि[13] हि उच्चकुलीं मजला भली[14]
परि कसे दिन मी मतिमंद हा
खरचितों ! रचितों[15] दुरितें[16] पहा ! ॥ ४२ ॥

मनुज[17] नाम वदो भलत्या[18] मिषें
तरिहि तारिति त्यां[19] पदसारसें[20]

---

१ स्तविले आहेत चरण ज्याचे अशा देवा ! २ दुःखसागर. ३ विषयारण्य. ४ कायमचें. ५ संसार हा. ६ मनाला. ७ ओकारीप्रमाणें. ८ अनुभवाला आणून दे. ९ वाटलाच समजावयाचा. १० अज्ञानांत. ११ बाल्य, बाळपण. १२ कसेंतरी. १३ जन्म. १४ चांगली १५ करतों. १६ पातकें. १७ नर. १८ वाटेल त्या निमित्तानें. १९ त्या मनुजाला. २० ( तुझीं ) पादकमळें.

कथिति[1] कंठरवें[2] श्रुतिकाय[3] ते*
कवि जनीं, विजनीं[4] रुतें[5] काय तें? ॥ ४२ ॥

धन नको मज दुर्गतिचें पद[।]
न रमणी[6] रमणीयहि तापद[०]
मज कशाचिहि बा रघुनंदना!
न परवा, परवाम[7]पदा विना ॥ ४४ ॥

अनृत नित्य धरी वदनांतरीं
परधनीं अपहारमती करी
प्रियतमा[8] अधिदैवत बाइल
न नर[9] कां नरकाप्रति जाइल? ॥ ४५ ॥

शरण मी तुजला, करुणाकरा!
तरणि[10] तूं असशी भवसागरा[11]
झडकरी विषतुल्य पुनर्भव[12]
चुकविं[13], गा[14]! कवि गाइल वैभव[15] ॥ ४६ ॥

मज कधीं वदनांबुज दाविशी

---

१ (वरील दोन चरणांत सांगितल्याप्रमाणें) कथन करतात. याचा कर्ता ' कवि ' २ गर्जून. ३ ध्वनिरूप अर्थात् काव्यरूप उरला आहे देह ज्यांचा असे. * प्रसिद्ध; हीं दोन्हीं ' कवि ' याचीं विशेषणें. ' मनुज भलत्या मिषें नाम वदो तरिहि त्या पदसारसें तारिती (असें) ते श्रुतिकाय कवि जनीं कंठरवें कथिति असा अन्वय. ४ अरण्यांत. ५ रुदन. वर सांगितल्याप्रमाणें कवि जें ह्मणतात तें काय निरर्थक आहे? जर तसें नसेल तर मला त्याचा अनुभव कां आणून देत नाहींस असा भाव. । स्थान. ६ स्त्री. ० ताप देणारी. ७ उत्कृष्ट आणि सुंदर अशा (तुझ्या) पदाशिवाय. ८ अत्यंत प्रिय. ९ वर सांगितल्याप्रमाणें आचरण करणारा नर. १० नाव. ११ संसारसमुद्राला. १२ पुनर्जन्म १३ टाळ. १४ अगा परमेश्वरा! १५ मोठेपणा

मजवरी करुणामृत सिंचिशी
हरिशि ताप कधीं मम? तापहा[1]!
वद[2] मला, दमला अति जीव हा ॥ ४७ ॥
विमल भाव, सख्या! तुज अर्पितों
नति तुझ्या चरणांवरि घालितों
क्षणभरींहि उपेक्षिसि तूं जनां
न विनतां[3], विनतात्मजवाहना[4]! ॥ ४८ ॥
मति तुझ्या पदिं लावि सुदामजी[5]
वितरिशी[6] तइं त्या वसुदाम[7], जी[8]!
करि कृपालहरी रुचिरा[9] तव
स्वधनदा[10]! धनदासम[11] मानवें[12] ॥ ४९ ॥
विषय सेवुनि[13] सेवुनि माझिया
विकलता जडली सकलेंद्रियां
अति मतिभ्रम, दुर्गति काय ही!
कृपण[14] मी; पण मीपण[15] त्यांतही[16] ॥ ५० ॥
पळभरींहि विराम न पावते
तव पदीं! विषयांमधिं धांवते
भ्रमविते, अखिलेश[17]! मला अति[18]

---

१ भवताप दूर करणाऱ्या! २ सांग. ३ नम्र अशा. हें 'जनां' याचें विशेषण. विनतां जनां तूं क्षणभरींहि न उपेक्षिसि असा अन्वय. ४ गरुडवाहना! ५ सुदामा ब्राह्मण. ६ देशी. ७ द्रव्याची देणगी. ८ अगा देवा! ९ सुंदर. १० आपलें धन (मोक्ष) देणाऱ्या! ११ कुबेराप्रमाणें. १२ मनुष्यांना. हे स्वधनदा! तव रुचिरा कृपालहरी मानव (मानवांना) धनदा सम करी असा अन्वय. १३ अत्यंत सेवन करून. १४ अनाथ, दीन. १५ अहंकार. १६ अनाथ असतांहि. १७ अखिलेश्वरा! १८ अत्यंत; हें 'भ्रमविते' याचें क्रियाविशेषण.

मति[1] सदा, तिसे[2] दाखवि सद्गति[3] ॥ ९१ ॥
खचित मी बुडतों भवसागरीं
धरुनियां वरतीं मज सांवरीं
तुजसि अर्पितसें,[4] नमुनी पदें
सकरुणा![5] करुणालहरीपदें[6] ॥ ९२ ॥

---

## जटिल.

शा. वि.

*वाणी प्रौढ मुखीं, जटा शिरिं, धरी पालाशदंडा[7] करीं
दिव्य ब्रह्ममय प्रभा विलसते ज्याच्या शरीरावरी
जाणो आश्रम मूर्तिमंत[8] पहिला[9]! कृष्णाजिनें[10] झांकिला
ऐसा एक युवा[11] गिरीशतनयापुण्याश्रमीं[12] पातला ॥ १ ॥
आतिथ्यामधिं दक्ष ती गिरिसुता पाहोनि त्या तोषली
जाऊनी पुढतीं प्रणाम करुनी पूजा तिनें अर्पिली

---

१- ' पावते, ' ' धांवते, ' आणि ' भ्रमविते; ' यांना मति हा कर्ता. ' भ्रमविते ' याचें ' मला ' हें कर्म. २ त्या मतीला. ३ सन्मार्ग, मोक्ष. ४ ( तुझीं ) पावलें. हें ' नमुनी ' याचें कर्म. ५ अगा करुणायुक्ता ! ६ ( या ) करुणालहरी-( काव्या ) चीं पदें. *आपणांस शिव हा पति मिळावा ह्मणून पार्वतीनें हिमालयावर तपश्चर्या चालविली असतां पार्वतीचें आपणांवर खरें प्रेम किती आहे हें पाहण्याकरितां शिवानें एका जटिलाचा ह्मणजे जटाधारी तापसाचा वेष धारण करून तिच्या तपोवनांत प्रवेश केला व तिच्याशीं भाषण-प्रसंग केला तो या ठिकाणीं वर्णिला आहे. ७ पळसाच्या दंडाला. 'धरी' या क्रियापदाचा ' जो ' हा अध्याहृत कर्ता असून ' वाणी, ' ' जटा, ' ' पालाशदंडा ' हीं त्याचीं कर्में होत. ८ रूपधारी. ९ पहिला आश्रम ह्म० ब्रह्मचर्याश्रम. १० हरिणाजिनानें आच्छादिलेला. ११ तरुण पुरुष. १२ पार्वतीच्या पवित्र आश्रमांत.

थोरें* व्यक्तिविशेषिं[1] आदर बहू दावीतसे प्रीतिनें
लोकीं तो अपुल्यासमान असतांही वैभवें कीर्तिनें ॥ २ ॥
तेणें तें विधियुक्त पूजन तदा अत्यादरें घेतलें
झालासे श्रम दूर हें क्षणभरीं बाहेरुनी दाविलें
फेंकी दृष्टि विकार[2]शून्य मग तो [3]शैलेन्द्रकन्येवरी
शिष्टाचार न सोडितां क्रमवशें संभाषणातें करी ॥ ३ ॥
होती कीं सुख[4]लभ्य दर्भ समिधा होमादि साधावया ?
तीर्थें, पार्वति ! आश्रमांत असतीं सुस्नात कीं व्हावया ?
होतां ताप न अल्पही तप तुझें अश्रांत कीं चाललें ?
देहाच्या सम धर्मसाधन दुजें लोकीं नसे चांगलें ॥ ४ ॥
लाक्षा[5]राग नसोनिही विलसतो आ[6]रक्तबिंबापरी
ऐसा हा अ[7]धरोष्ठ पाहुनि तुझा स्पर्धा मनीं जो[8] करी
बारी घालुनिया ज[9]या निशिंदिनीं त्वां पोषियेलें स्वतां
वाढे कीं मृदु[10]ताम्रपल्लव सुखें तो या[11] लतांचा अतां ? ॥५॥
घेती प्रेमभरें करांतुनि तुझ्या जे[12] दर्भ ओढोनिया
ज्यांच्या सं[13]भ्रमयुक्त चारु[14]गमनें चैतन्य[15] भूमीस[16] या
ज्यांचे अक्षि[17] तवाक्षिसा[18]म्य वरिती होऊनिया चंचळ
दृष्टी ठेविशि ना मृगांवरि तयां तूं आपुली प्रेमळ ? ॥ ६ ॥

---

*मोठा मनुष्य. १ थोर माणसाला. २ प्रेमादिविकाररहित; आपल्या सोगाची बतावणी बेमालूम व्हावी ह्मणून शिवानें आपल्या कटाक्षांस प्रेमाचा स्पर्शही होऊं दिला नाहीं असा भाव. ३ पार्वतीवर. ४ सहज मिळण्यासारख्या. ५ लाखेचा रंग. ६ तांबूस तोंडल्याप्रमाणें. ७ खालचा ओंठ. ८ जो ताम्रपल्लव. ९ तांबड्या पाल्याला. १० कोंवळा तांबडा पाला. ११ पुढें दिसणाऱ्या. १२ जे मृग. १३ विलासयुक्त. १४ सुंदरगतीनें. १५ जीव. १६ या आश्रमाला ( येते ). १७ डोळे. १८ तुझ्या डोळ्यांची बरोबरी.

जेथें सुंदर रम्य रूप दिसतें तेथें नसे [1]दुर्मति
ऐसें [2]बोलति तें [3]यथार्थ गमतें माझ्या मना पार्वति !
बाले, शोभ[4]नदर्शने ! तव असे हें शील नामी किती !
योगी तापसही खरोखरि मनोभावें तया[5] वंदिती ॥ ७ ॥
सप्तर्षी, गिरि[6]कन्यके ! नमुनिया पुष्पांजली अर्पिती
आकाशांत, तयामुळें फुलुनिया होई[7] सुरम्याकृति[8]
तो [9]गंगौघ न तेविं पावन करी ताता तुझ्या [10]सान्वय
जेवीं तीं [11]चरितें तुझीं [12]सुविमलें; हा मन्मनीं निश्चय ॥ ८ ॥
चित्ताचा करुनी निरोध आपुल्या त्वां शांत त्या ठेविलें
धर्मा ठेवुनि अर्थकाम अगदीं दूरीं करीं सारिले
तेणें [13]भाविनि ! शैलराजतनये ! धर्मार्थकामांतुनी
लोकां केवळ धर्म सौख्यद असे ये आज माझ्या मनीं ॥९॥
मोठा आदर आज दावुनि जया पूजा तुवां अर्पिली
त्या मातें परकीयसा न समजे, शैलेन्द्रजे ! अंतरीं
याचें कारण सुंदरांगि ! वदती ते थोर लोक स्वतां
मैत्री [14]सप्तपदींच होय सुजनांमध्यें [15]असें तत्त्वतां ॥ १० ॥
ऐसें सख्यचि आपणांमधिं अतां उत्पन्न झालें असे
त्यायोगें तुज, [16]शांतिशालिनि ! गमे कांहीं पुसावें असें

---

१ वाईट बुद्धि. २ याला 'लोक' हा अध्याहृत कर्ता. ३ योग्य. ४ सुंदरानने ! ५ त्या शीलाला. ६ पार्वति ! ७ याला जो ( गंगौघ ) हा अध्याहृत कर्ता. ८ अत्यंत सुंदर रूप ज्याचें असा. ९ गंगेचा प्रवाह. १० वंशासह; हें क्रियाविशेषण. याचा संबंध ' पावन करी ' या क्रियापदाकडे. ११ कृत्यें. १२ फार पवित्र. १३ हे उदार विचाराचे स्त्रिये ! १४ सात शब्द बोलल्यामुळें किंवा सात पावलें बरोबर चालल्यामुळें. १५ असें तें थोर लोक तत्त्वतां स्वतां वदती इ० अन्वय. १६ शमगुणानें शोभणारे स्त्रिये !

आहे मी द्विज यामुळें चपलता अंगीं स्वभावें वसे
देई उत्तर त्यांत सुंदरि! जरी, गे! गुप्त कांहीं नसे ॥११॥
झाला जन्म हिरण्यगर्भकुलिं त्या, तारुण्यकांती भली
त्रैलोक्यांतिल रूप एकवटुनी जाणो तनू जाहली!
तेव्हां आपण होउनी विभवही त्वन्मंदिरीं राहिलें
हे चार्वङ्गि! वदे तपःफल असे याहूनि कीं आगळें?॥१२॥
कांहीं दुःसहसें अनिष्ट घडतां धैर्यान्विता मानिनी
स्वेच्छेनें तप साधण्यास असलें उद्युक्त होती जनीं
पाहीं अंतरिं मी विचार करुनी कांहीं इथें हें असें
झालें कीं? परि, शैलराजतनये! कांहीं दिसेना तसें ॥ १३ ॥
अंगीं यौवन दाटलें असुनिया तूं भूषणें टाकिशी
शोभे वृद्धपणास वल्कल असें कां नेसुनी बैसशी?
तारामंडल आणि इंदु मिरवे जीमाजि तेजें, अशी
रात्री होइल सांग योग्य अरुणा सेवावयाला कशी? ॥१४॥
पाहोनी तव सौम्यदर्शन असें माझ्या मनीं येतसें
कीं तूतें अपमानदुःख अणुही चित्तांत ठावें नसे

---

१ ब्रह्मदेवाच्या वंशांत. २ लक्ष्मीचें वैभव. ३ सुंदरांगि! ४ तपाचें फळ. ५ अधिक; विशेष. ६ अनिष्ट गोष्ट किंवा कार्य. ७ धैर्ययुक्त. ८ मानवती स्त्रिया. ९ तयार. १० तुझ्या ठिकाणीं. ११ तारुण्य. १२ प्रदोपकाल हा रात्रीचा पहिला भाग असल्यामुळें तो तिचें पूर्ववय होय; आणि अरुणोदयाचा काल तिचा शेवटचा भाग असल्यामुळें तो तिची वृद्धावस्था होय. आपल्या पूर्ववयांत म्ह० तारुण्यांत रात्रीनें तेजस्वी तारामंडळ आणि दिव्य चंद्रमा हे अलंकार धारण करणेंच योग्य आहे. वृद्धपणीं सेवन करण्याला योग्य जो अरुण त्याचें सेवन तिनें तारुण्यामध्यें करणें सर्वथा अनुचित होय असा भाव. १३ ज्या रात्रीच्या ठिकाणीं. १४ रात्र. १५ सौम्य स्वरूप.

थोडीही अवमानना पितृगृहीं होई तुझी कोठुनी ?
कोणी धृष्टपणा करील तुजशी हें संभवेना जनीं ॥ १५ ॥
व्हावा स्वर्ग ह्मणोनि उग्र तप हें तूं आचरीशी तरी
हा व्यर्थ श्रम! देवभूमि तुझिया तातप्रदेशांतरीं
किंवा इच्छिसि अंतरीं पति, तरी आयास हा कासया!
शोधी ग्राहक रत्न! रत्न कधिं त्या जातें न शोधावया॥ १६ ॥
हेतु त्वन्मनिंचा स्वयें सुचवितो अत्युष्ण निःश्वास हा
येई संशय माझिया परि मनीं शैलेंद्रकन्ये! पहा,
येथें त्वत्प्रणयास योग्य असला कोणी दिसेना मला
चित्तीं इच्छिसि ज्यास तो न मिळता होईल कैसा तुला? ॥ १७ ॥
आली पांडुरता मुखीं, दिसतसे निस्तेज गंडस्थली
लोंबे तीवरी रूक्ष पिंगट जटारूपें हि केशावली
पाहोनी अनुकंप्य ही स्थिति तुझी जो न द्रवे अंतरीं
ऐसा निर्दय पाहिला पति तुवां; हे गोष्ट आहे खरी ॥ १८ ॥
आलीसे नियमव्रतें करुनिया अंगीं तुझ्या क्षीणता
भूष्यांगां अतिचंडभानुकिरणीं आली तशी श्यामता
जैसी इन्दुकला दिनीं, तव तनू निस्तेज झाली तशी

---

१ अपमान. २ दांडगाई. ३ तपाचे कष्ट. ४ कशाला ? ५ (सोळाव्या श्लोकांतील जटिलाचें भाषण झाल्यावर पार्वतीनें स्वाभिप्रायसूचक उष्ण श्वास टाकला त्याला अनुलक्षून जटिल पुढें तिला ह्मणतो.) हा तूं आतां सोडलेला फार उष्ण श्वास तुझ्या मनांतला हेतु स्वतःच सुचवीत आहे. ६ तुझ्या प्रेमाला. ७ न मिळणारा असा. ८ फिकटपणा. ९ गालाचा प्रदेश. १० गंडप्रदेशावर. ११ केशपंक्ति. १२ मनाचा निरोध आणि धर्मसंबंधीं कृत्यें. १३ क्षीणता. १४ भूषणें घालण्याच्या स्थानांना. १५ फार तीव्र अशा सूर्यकिरणांनीं. १६ काळसरपणा.

तीतें पाहुनिया व्यथा सहृदया* होणार नाहीं कशी? ॥१९॥
देहा कष्टविणार तूं किति तरी, पूर्वाश्रमींचें असे
माझें सांचित पुण्य, घे गिरिसुते! त्यांतूनि अर्धं कसें[1]
त्यायोगें तुजला मिळो पति जसा तूं इच्छिसी अंतरीं
आहे कोण, कसा, तसाचि कुठला तो, सांग आतां तरी॥२०॥
युक्तीनें गुजगोष्ट[2] त्या द्विजवरें या रीतिनें काढिली
लज्जेनें परि पार्वती न किमपि प्रत्युत्तरा बोलली
होती एक सखी समीप बसली चातुर्यखाणी भली
दृष्टी अंजनशून्य[3] मात्र तिकडे प्रेमें तिनें प्रेरिली ॥ २१ ॥

---

## विदुरोपदेश.

फटका.

राजा[4]! तुजला आज सांगतों चार हिताचे शब्द बरें
सावधान मन करोनि परिसे त्यांतचि तव कल्याण खरें ॥१॥
परिणामावर नजर देउनी कार्य करावें सदा नरें
अविचाराची प्रवृत्ति होतां कार्यसिद्धि ती दूर सरे ॥ २ ॥
राज्य मिळालें ह्मणुनि वागणें यथेच्छ नोहे अनुरूप
धनजनवैभव अनीति[5] नाशी जरा जशी सुंदर रूप ॥ ३ ॥

---

* सहृदय मनुष्याला. १ घे कसें इ० अन्वय. २ गुप्त गोष्ट. ३ काजळ जिच्यांत नाहीं अशी; तपश्चर्या करीत असतां वेणीफणी करणें, काजळकुंकू करणें इत्यादि मांगलिक व विलासाच्या क्रिया यांचा त्याग स्त्रियांना करावा लागतो; ह्मणून कवीनें पार्वतीच्या दृष्टीला ‘ अंजनशून्य ’ हें विशेषण दिलें. ४ हे धृतराष्ट्रा ! या फटक्यामध्यें विदुरानें आपल्या बंधूला केलेला उपदेश वर्णन केला आहे. हा प्रसंग भारतांत आला आहे. ५ हा ‘ नाशी ’ याचा कर्ता. ‘ नाशी ’ याचें कर्म ‘ धनजनवैभव. ’

भक्ष्य लक्षुनी तोंडावरचें फसतो मासा जसा गळीं
विचार सोडुनि चार[1] करी तो मनोविकारां पडे बळी ॥ ४ ॥
कुसुम रक्षुनी भक्षण करितो कुसुमांतिल मधु मधुव्रत[2]
दुःख न देतां परापासुनी अर्थ साधणें हें उचित ॥ ५ ॥
सकरुण दृष्टि, प्रसन्न मानस, शुद्ध आचरण, ऋत[3] वाणी
यांहीं करितो प्रसन्न लोकां तद्यश कविवर वाखाणी ॥ ६ ॥
पाहुनि ज्याला प्रजाजनाच्या धडकी भरते हृदयांत
क्षितिपति असुनी गणति तयाची कधीं न होई मनुजांत ॥७॥
सत्पथ हितकर सेवन करितां नरपति होतो बहुत बली
वसुधा वसुसंपन्ना होउनि भूति[4] वाढते तिच्यांतली ॥ ८ ॥
स्वबांधवांना बुडवायाचा, राया! करिशी यत्न किती
तत्परिपालनिं जागशील तरि तुझिया पुण्या नसे मिती ॥९॥
मिळवावी धनदौलत धर्मैं, धर्मैं ती परिपाळावी
धर्मोपार्जित लक्ष्मी अपुली चंचलता अणुहि न दावी ॥१०॥
गंधानें[5] मृगीं[6], वेदांनीं द्विज, चारांनीं[7] वसुमतीश्वर[8]
नयनांनीं नर इतर पाहती, यांतिल जाणसि तत्त्व वर[9] ॥११॥
सत्यपालनें धर्म राहतो, व्यासंगानें श्रुत[10] जागे[11]
रूप शुचित्वें[12], आचारें कुल, महोन्नतीतें[13] धरुं लागे ॥ १२ ॥
मलिन आचरण जया नराचें त्याला कुल[14] तें काय करी?
परिणामीं तें[15] फार जाचतें विचार याचा हृदयीं धरीं ॥१३॥
पुत्रदारधन यांनीं बंधो! अंध होतसे मंदमति
सुमति तयाचें स्वरूप जाणुनि कधीं न त्यामाजी रमती॥१४॥

१ चाळे, चेष्टा. २ भ्रमर. ३ सत्य. ४ ऐश्वर्य. ५ वासानें. ६ पशु. ७ हेरांनीं. ८ राजे. ९ श्रेष्ठ. १० विद्या. ११ कायम राहतें. १२ शुद्धपणानें. १३ अत्यंत उच्चपणाला. १४ उच्च कुल. १५ मलिन आचरण.

अभ्यासानें धैर्य धरुनिया करणांचा[1] जो करि नियम[2]
सकल खलांना अंतरिं वाटे खरोखरी जो दुजा यम ॥१५॥
विचार करुनी सार गोष्ट जो करी न चुकतो धर्मासी
स्थिरतर होउनि विनयें होते, अगा! इंदिरा[3] तद्दासी[4] ॥१६॥
धर्मार्थांना[5] सोडुनि झाला इंद्रियवश[6] जो अधम नर
लक्ष्मी, दारा, सुत, प्राणही तयासि सोडुनि जाति दुर ॥१७॥
विक्रम[7] करुनी धनपति[8] झाला तरि न इंद्रियें ज्यास वश
ऐश्वर्याला मुकतो तो नर, रडे होउनी मग विवश[9] ॥ १८ ॥
पीडा करुनी परांस, साधी स्वार्थ; असे तो नर वेडा
वेडा अतिशय सौम्य विशेषण, वाटे तो खरं[10] वा[11] रेडा ॥१९
खरें असोनी मिष्ट बोलणें इष्ट असे गा कुरुराया !
संप्रदाय हा शिष्ट अनुसरे, लाग तसाची चालाया ॥ २० ॥

---

## सौंदर्यलहरी.

### शिखरिणी.

जिनें[12] ब्रह्मालाही कवि[13] ह्मणाति येतो प्रभुपणा[14]
नसे ती त्यापाशीं तरि मग तया पंगूंचि[15] गणा
अशी जी कां शक्ती[16] हरिमुखहि[17] जीलागि भजती
नमूं किंवा वर्णूं तिस असुकृती[18] केविं शकती ? ॥ १ ॥
तुझ्या पादाब्जाचें अतिलघु असें जें रज असे

---

१ इंद्रियांचा. २ दमन. ३ लक्ष्मी. ४ त्याची दासी. ५ धर्म आणि अर्थ यांना. ६ इंद्रियांच्या स्वाधीन. ७ पराक्रम. ८ कुबेर. ९ अनाथ. १० गर्दभ. ११ अथवा. १२ ज्या शक्तीनें. या सौंदर्यलहरीस्तोत्रांत आदिमाया भगवती हिचें वर्णन आहे. १३ ज्ञाते. १४ मोठेपणा. १५ व्यंग, पांगळा. १६ आदिमाया. १७ विष्णुप्रमुख. १८ पापी. तिस ( त्या मायेला ) असुकृती नमूं किंवा वर्णूं केविं शकती असा अन्वय.

उपादानत्वें[1] तद्[2]ग्रहण[3] करुनी हें रचितसे
जगत् सारें ब्रह्मा; अवन हरि त्याचेंचि करितो
तसा कल्पांतीं, हे जननि ! हर त्यातें विघटितो[4] ॥२॥
करांच्या योगानें अभय[5]वरमुद्रेसि धरिती
तुझ्याहूनी ऐसे इतर सगळे देव असती
भया वारोनी दे जगतिवरि वांच्छा[6]धिक फला
अशी शक्ती एक्या, भगवति ! तुझ्या पादकमला ॥३॥
धरा तूं, वारी तूं, अनलपवना[7]काश, मन ही
तुझीं रूपें सारीं प्रथित[8] असतीं शास्त्र[9]निवहीं
अशी विश्वाकारें[10] परिणति[11] घडावी ह्मणुनिया
चिदा[12]नंदाकारा धरिशि शिवपत्नी बनुनिया ॥ ४ ॥
तुला[13] आराधोनी हरि युवतिरूपास नटला
जयातें देखोनी स्मरहरहि[14] अत्यंत भुलला
अनंगा[15] ही रम्या तनु मिळुनि तो मोहित करी

---

१ कारणरूपानें. २ त्याचा (रजाचा) स्वीकार. ३ हें जगत् ब्रह्मा रचितसे इत्यादि अन्वय. ४ नष्ट करितो. ५ अभयरूप प्रसादाच्या चिन्हाला. ६ इच्छेपेक्षां जास्त. ७ अग्नि, वायु आणि आकाश. ८ प्रसिद्ध. ९ अनेक शास्त्रग्रंथांत. १० विश्वरूपानें. ११ विकास. १२ ज्ञानानंदात्मकस्वरूपाला. १३ कोणे एके प्रसंगीं नारायणानें स्त्रीवेष धारण करून कनकस्वामी-(?) चें मन वश करून त्यास मारिलें; त्यावेळचें स्त्रीस्वरूप आपणांस दाखविण्याविषयीं शिवानें नारायणाची प्रार्थना केली. त्यावरून नारायणानें त्या रूपानें प्रकट होऊन शिवाचें चित्त मोहित केलें, अशी पौराणिक कथा आहे. तिला अनुलक्षून हें वर्णन आहेसें दिसतें. १४मदनाचें मथन करणारा शिवही. १५मदनालाही; मदनानें त्रिपुरसुंदरीचें आराधन करून आपलें अनंगत्व घालविलें व सुंदरांगत्व संपादन केलें अशी कथा वामकेश्वरमहातंत्रांत आढळते.

मुनींचींही[1] चित्तें, तव भजनशक्ती आशि खरी ॥५॥
फुलांचें कोदंडे[2], भ्रमरमय मौर्वी[3], शर तसे
सरोजादी[4] पंच स्फुट, सुरभि[5] साह्यप्रद असे
गती ज्याची राहे अचपल[6], असे शीत बहुत
सुखस्पर्शी[7] ऐसा मलयभव[8] तो मारुत[9] रथ
अशी सामग्री तों सकलहि मृदू फार असुनी
तुझ्या प्रेमांपांगें[10] मदन अखिलक्षोणिस[11] जिंणी* ॥ ६ ॥
स्फुरे[12] कांची[13] श्रोणीतटिं[14], युग कुचांचें कलशसें[15]
कटी सूक्ष्मा भारी, मुख विमल पूर्णेन्दु विलसे
धनू, बाणा, पाशा, सृणिस[16] धरि चाऱ्हीं निजकरीं
अशी शैवी शक्ती सतत विलसो संमुख[17] बरी॥ ७ ॥
मही[18] मूलाधारीं[19], उदक[20] मणिपूरांत[21], अनल[22]
वसे स्वाधिष्ठानीं[23], हृदयगतचक्रांत[24] अनिल[25]
अशा चक्रांच्याही उपरितनचक्रांत[26] गगन[27]
असे आज्ञाचक्रीं[28] मने[29], ह्मणति तत्वज्ञ[30] निपुण ॥८॥

---

१ मुनि स्थिरमति असतात ह्मणून त्याच्या पुढील 'ही' या पदाचें स्वारस्य येथें विविक्षित आहे. २ धनुष्य. ३ दोरी. ४ कमलादिक. ५ वसंत. ६ मंद. ७ सुखकारक आहे स्पर्श ज्याचा असा. ८ मलयपर्वतावर उत्पन्न झालेला. ९ वायु. १० प्रेमकटाक्षांनीं. ११ सगळ्या पृथ्वीला. * जिंकतो. १२ चमकते. १३ कमरपट्टा. १४ श्रोणीप्रदेशावर. १५ अल्प कुंभासारखे. १६ अंकुशाला. १७ समोर. १८ पृथ्वीतत्व. १९ मूलाधार नामक चक्रांत. २० उदकतत्व. २१ मणिपूर नामक चक्रांत. २२ अग्नितत्व. २३ स्वाधिष्ठानचक्रांत. २४ अनाहतचक्रांत. २५ वायुतत्व. २६ वरल्या ह्म० विशुद्धिचक्रांत. २७ आकाशतत्व. २८ आज्ञाचक्रांत. २९ मन हें तत्व. ३० तंत्व जाणणारे विद्वान्.

अशीं षट्चक्रें हीं सकलहि शरीरांत असती
तयांमाजीं, माते! तव अनुचरी वास करिती
तयां उल्लंघोनी दशशतदळें[1] ज्यास असतीं
अशा पद्मीं क्रीडा करिशि पतिसंगें[2], भगवति[3]! ॥९॥

सुधेन्दुक्षीराभ[4] प्रकट मुकुटीं इंदु विलसे
करीं माला, पोथी, वरें[5], सभयरक्षा[6] धरितसे
सकृत्[7] रूप ऐशा तव करिति लोकीं नमन जे
तयांच्या वाणीतें अमृतसम माधुर्य निपजे ॥ १० ॥

कवींच्या हृत्पद्मोपरि[8] अरुणवर्णा भगवती
अशा तूतें कोणी भजक हृदयामाजि धरिती
सदुक्तीची शक्ती अति सुरस त्यांना त्वरित ये
बळें वेधी जी कां सहृदयमनाला अतिशयें ॥११॥

जिच्या अंगांतूनी अमृतचि सदा पाझरतसे
अशा तूतें ध्यातां नर अमृतदृष्टी बनतसे
विलोकी तो सर्पा तरि पळति दर्पा[9] त्यजुनि ते
तशी त्याची दृष्टि ज्वरजनितसंताप[10] हरिते ॥१२॥

'भवानि[11]! त्वं दासे मयि वितर दृष्टिं सकरुणाम्'
असें प्रार्थायाला भजक जंव आरंभि वचना
'भवानि! त्वं[12]' ऐसें श्रवणिं पडतां तत्क्षणिं अहा!

---

१ सहस्र दळें. २ सदाशिवाबरोबर. ३ हे जननि. ४ चुना, कापूर आणि दूध यांच्याप्रमाणें कान्ति ज्याचा असा. ५ प्रसाद. ६ भययुक्त भक्तांचें रक्षण. ७ एकवार. ८ हृदयरूप कमलासारखी. ९ गर्वाला. १० ज्वरापासून उत्पन्न झालेल्या संतापाला. ११ 'हे भवानि, या तुझ्या दासावर करुणाकटाक्ष फेंक' असा या संस्कृत चरणाचा अर्थ आहे. १२ 'भवानि! त्वं' असे दोन शब्द.

[1]भवानित्वा देशी! जननि! तव औदार्यचि महा! १३
शिवाच्या तूं अर्ध्या न, परि सगळ्याही सुतनुला
[2]हरीशी, शंका हे मज निपजते देखुनि तुला
पहा, देहा कांती अरुण, नयनें तीन असतीं
कला रम्या भालीं विमलविधुची तेविं [3]दिसती ॥१४॥
[4]विरंची [5]पंचत्वा, हरि [6]विरतिला, काळ मरणा
तसा पावे नाशाप्रति धनद, [7]देवेंद्र [8]निधना
असें कल्पांतीं हें सकलच लया पावत असे
तुझ्या सौभाग्यानें तव पति [9]लयातीत विलसे! ॥१५॥
[10]किरीटांची शोभा तव कवण वर्णील [11]जननि!
जया माणिक्यांच्या स्थलिं विलसती दिव्य [12]तरणी
तयांच्या कांतीनें [13]शबल विधुचें खंड दिसतें
विलोकोनी वाटे रुचिर [14]मघव्याचेंचि धनु तें ॥ १६॥
जयाच्या साम्यातें वरिति [15]नवनीलोत्पलवनें
जयाच्या सौगंध्या स्तविति बहु [16]मंदारसुमनें
तुझा ऐसा जो कां जननि! [17]कबरीभार रुचिर
हरो तो माझें हें [18]हृदयंगत [19]अज्ञानतिमिर ॥ १७ ॥

---

१ भवानीपणाला. ' भवानि, त्वं ' असे शब्द भक्ताच्या मुखावाटें निघतांच तूं त्याला भवानित्व देतेस ह्मणजे भवानीच करून सोडतेस असा अर्थ. २ तूं शिवाच्या अर्ध्या न परि सगळ्याही सुतनुला हरीशी ( हरण करितेस ) असा अन्वय. ३ दिसते. ४ ब्रह्मदेव. ५ मृत्यूला. ६ विरामाप्रत. ७ इंद्र. ८ मरणाला. ' पंचत्वा, ' ' विरतिला, ' आणि 'निधना' या पदांचा 'पावे' या क्रियापदाकडे संबंध. ९ नाशापलीकडे. १० मुकुटाची. ११ हे आई. १२ सूर्य. १३ चित्रविचित्र. १४ इंद्राचें. १५ प्रफुल्लित निळ्या कमळांचे ताटवे. १६ मंदार नांवाच्या देववृक्षांचीं फुलें. १७ केशपाश. १८ हृदयांत असणारे. १९ अज्ञानरूप अंधकार.

६१ मराठी

तुझ्या भांगामध्यें नहु अरुण सिंदूर भरला
नवा बालार्काचा[1] किरण मम चित्तास गमला
सुकेशांचे कांतिव्रज[2] भंवतिं त्याच्या विलसती
तयांनीं तो बंदीकृत[3] जणु असें लोक ह्मणती ॥ १८ ॥

मुखाचें सौंदर्य, क्षितिधरसुते[4] ! दाटुनि तया
नसे कोठें मार्ग त्वरित निघण्याला ह्मणुनिया
असे भांगाचा हा नहर रचिला कीं? भगवति !
असे काव्यामाजीं निपुण कवि निःशंक ह्मणती ॥ १९ ॥

सुगांधि त्वद्वक्त्र, स्फुट[5] विमल अंभोरुह[6] असे
जयांच्या भोंतालीं कुटिलकचवृंद[7] भ्रमरसे[8]
तशी दंतांची ही धवलरुचि[9] जी केसरचि[10] ते
मदालीगी[11] घेती शिवनयनरूपभ्रमर[12] ते ॥ २० ॥

किरीटीं शोभाढ्यीं[13] विमल विधुचें खंड दिसतें
तुझें देवी भालस्थल मज दुजें तेंचि गमतें
जई सामुख्यानें[14] दृढ[15] उभयसंयोगाचि[16] घडे
तई तो[17] पूर्णेन्दू सुघटित[18] जनीं दृष्टिस पडे ॥ २१ ॥

---

१ कोंवळ्या सूर्याचा. २ तेजाचे समुदाय. ३ कोंडलेला. ४ पर्वतकन्ये. ५ प्रफुल्लित. ६ कमल. ७ कुरळ्या केशांचे समुदाय. ८ भ्रमरांसारखे. ९ शुभ्रकांति. १० तंतु. ११ रसाला. १२ शिवनयन हेच भुंगे. १३ शोभायुक्त हें ' किरीटीं ' याचें विशेषण. १४ उलट समोरासमोर होण्यानें. १५ बळकट. १६ भालस्थल आणि किरीटगतचंद्रकला यांचा मिलाफ. १७ प्रसिद्ध पूर्णचंद्र. १८ चांगला तयार झालेला.

तव [1]भ्रूवल्ली त्या कुटिल मदनाचें धनु, तशी
गमे दृष्टी [2]मौर्वी, अतिरुचिर [3]कृष्णभ्रमरशी
दिसेना दोहींचा [4]हिमनगसुते ! भाग मधला
धरी हस्ताग्रीं त्या स्मर ह्मणुनि आच्छादित मला २२

कवींद्रांचीं स्तोत्रें सुरस भरलीं ज्यांत असतीं
अशा त्या कर्णांच्या निकट नयनें दोन असतीं
विलोकोनी त्यांतें नयन तिसरें [5]भालगत तें
[6]असूयेनें जाणों, हिमनगसुते ! रक्त दिसतें ॥२३॥

[7]हरीं [8]शृंगारार्द्रा, इतरपुरुषीं [9]कुत्सनपरा
[10]सरोषा गंगेशीं, [11]शिवसुचरितीं [12]विस्मिततरा
हराचे [13]भूषाही निरखुनि मनीं भीति धरिते
स्वकीया तेजानें [14]कमलवनसौभाग्य हरिते
सख्यांशीं [15]स्मेरोढ्या, मजविषयिं होऊनि सदया
हरो दृष्टी ऐशी तव, जननि ! या [16]संसृतिभया २४
[17]रहाती कर्णाच्या जवळिं, मृदु[18]पक्ष्मेंहि असतीं
[19]जयां [20]पुंखांऐसीं, बहु गिरिसुते ! जीं विलसतीं

---

१ भ्रूलता; भोंवयारूप वेली. २ धनुष्याची दोरी. ३ काळ्या भ्रमरासारखी. ४ हिमालयकन्ये ! ५ कपाळावर असणारे. ६ मत्सरानें. दुसऱ्या दोन नयनांना कर्णांचें सान्निध्य असल्यामुळें कवींद्रांच्या सुरसस्तोत्रांचा लाभ झाला; आपण दूर पडल्यामुळें आपणांस तो तसा झाला नाहीं ह्मणून त्या दोन नयनांविषयीं मत्सर. ७ हराच्या ठायीं. ८ शृंगाररसानें ओथंबलेली. ९ तिरस्कारयुक्त. १० ( सवतमत्सरानें ) रागावलेली. ११ शिवाच्या लीलांविषयीं. १२ फार विस्मय पावलेली. १३ भूषणार्थ घातलेले सर्प. १४ कमलवनाचें सौंदर्य. १५ स्मितयुक्ता. १६ या संसारभयाला. १७ याला ' जीं ' ( नेत्रें ) हा कर्ता. १८ मऊ पापण्या. १९ ज्या नेत्रांना. २० पुच्छासारखीं.

स्मरारीच्या[1] चित्ता शम हरुनि कामार्त करितीं
तुझीं ऐशीं नेत्रें मदनशरलीलेस[2] धरितीं ॥ २५ ॥
तुझ्या नेत्रां वर्ण स्फुट अरुण तेवीं सित[3] असे
तृतीया नेत्राला अरुणपण[4] ये कज्जलवशें[5]
ह्मणोनी सत्वादि[6] प्रकृतिगुण[7] जे तीन असती
हरीत्र्यादी[8] ते हे करिति बुध ऐसी अनुमिती[9] ॥२६॥
नदी शोणा[10], गंगा[11], तपनतनया[12], यांपरि महा
धरिशी[13] तीर्थांचा असुलभ असा संगम पहा!
दयार्द्रा होवोनीं, अरुणधवलश्याम[14], नयनीं
जनांच्या पापौघा हरण करण्यासाठिं, जननी! ॥२७॥
तुझीं नेत्रें कर्णी[15] सतत, जननी! लग्न असतीं
ह्मणोनी मीनाली[16] उदकिं लपती वाटुनि भिती
तशी श्री[17] टाकूनी कुवलय[18] दिनीं[19], रात्रि परते

---

१ शिवाच्या. २ मदनाच्या बाणाच्या लीलेला. येथें भगवतीच्या नेत्रांवर बाणांची कल्पना करून त्यांच्या पापण्यांवर पुंखांची कल्पना केली आहे. ३ पांढरा. ४ लालपणा. ५ काजळानें. ६ सत्व, रज आणि तम हे (प्रकृतीचे गुण). सत्वरजस्तम यांचा वर्ण अनुक्रमें श्वेत, रक्त आणि नील असतो अशी कविप्रसिद्धि आहे. ७ मायेचे गुण. ८ विष्णुप्रभृति. ९ तर्क. १० शोणभद्र. ११ भागीरथी. १२ यमुना. १३ असुलभ संगम नयनीं धरिशी इ० अन्वय १४ तांबडा, पांढरा आणि काळा. हे 'संगम' याचें विशेषण. भगवतीच्या अरुण, धवल व श्याम या वर्णांनीं युक्त तीन नेत्रांवर शोणभद्र, गंगा व यमुना यांच्या अदृष्टपूर्व व अश्रुतपूर्व संगमाची मनोहर कल्पना येथें केली आहे. १५ कर्णी लग्न असतीं ह्म० कानाशीं लागलीं आहेत. कानाशीं लागणें हे चहाडखोराचें लक्षण आहे. या पदांनीं नेत्रांचें आकर्णपातित्वही ध्वनित झालें. १६ मत्स्यांच्या पंक्ति. १७ लक्ष्मी. १८ चंद्रविकासि कमल. १९ दिवसां.

असें! माते! लोकीं बहुत पिशुनाला[1] मन भितें ॥२८
तुझ्या[2] नेत्रोन्मेषें ह्मणाति जगदुत्पत्ति, जननि!
तसें नाशा पावें सकलहि तुझ्या नेत्र[3]-मिलनीं
असा हा सिद्धांत प्रथितें[4] म्हणुनी काय, सदये!
तुवां स्वीकारीलें सतत अनिमेषत्वचि[5], अये ॥ २९ ॥
तुझी दृष्टी दीर्घा तशिच करुणार्द्रा विलसते
तिनें दूरस्थाही[6] मज निरखिं दीनासि निरुतें[7]
तुझी हानी[8] नोहे, मज तरि बहू लाभ घडती
महालीं रानींही किरण विधुचे[9] तुल्य पडती ॥ ३० ॥
तुझ्या बाळ्या दोन्ही विधुशकलशा[10] वक्र असती
अनंगाचे[11] चांप प्रथितें[12] जन त्यांना समजती
अपांगांच्या[13] योगें सशर[14] गमती त्या, भगवति!
हराच्याही चित्ता निपजविति त्या[15] शीघ्र विकृति[16] ३१
सरस्वत्युक्ती[17] ज्या मधुर अमृताहूनि असती
तयांतें ऐकोनी शिर तुकविशी[18] जै भगवती!

---

१ चहाडखोराला. हे भगवति! तुझ्या नेत्रांची स्पर्धा करणाऱ्या मीनपंक्ति आणि कुवलयश्री यांना तुझीं नेत्रें तुझ्या कानांशीं लागल्यामुळें आपल्यावर आतां काय प्रसंग येतो कोण जाणें अशी भीति वाटून त्यांपैकीं पहिलीनें ह्मणजे मीनपंक्तीनें पाण्यांत दडी मारली आहे व दुसरीनें ह्मणजे कुवलयश्रीनें दिवसां कोठें तरी लपून राहण्याचा निश्चय केला आहे! असा भाव. २ नेत्र उघडण्यानें. ३ नेत्र मिटले ह्मणजे. ४ प्रसिद्ध. ५ निमेषरहितत्व. ६ दूर असणाऱ्या (मज) ७ खरोखर. ८ नुकसान. ९ चंद्राचे. १० चंद्रकोरीसारख्या. ११ धनुष्यें. १२ प्रसिद्ध. १३ कटाक्षांच्या. १४ बाणयुक्त. १५ बाळ्या. १६ विकार. १७ सरस्वतीचे आलाप. १८ आनंदानें हलवितेस किंवा डोलवितेस.

तईं होई मंजुस्वन[1] मणिगणांचा[2] श्रुतिंतल्या[3]
जणों तें वाणीला, प्रतिवचन[4] देशी, परिशिल्यो[5] ३२
जईं वाणी[6] वीणेवरि शिवगुणां[7] गाय[*] बसुनी
तिची मोदें[8] श्लाघा[9], जननि! करिशी साधुवचनीं[10]
तुझा तेव्हां कर्णीं स्वरमधुरिमा[11] ती[12] परिसुनी
सलज्जा होवोनी त्वरित करि वीणे[13] गवसणी[14] ॥२३॥
नखांच्या लालीनें नवनलिनरागास[15] हंसती
अशा वानूं हस्तां तव वद कसें गे भगवति!
अहा! लक्ष्मीपादें[16] अरुणपण[17] ये ज्यास बरवें[18]
तुझी त्या पद्माला करसदृशता[19] केविं म्हणवे? ॥२४
तुझें लाक्षारागें[20] अरुणतम[21], अत्यंत रुचिर
नमीं मी तें पादद्वय, भगवती! जोडुनि कर
जयाच्या आघातास्तव[22] मदनशत्रूहि शिव तो
अशोकाची[23] ईर्ष्या[24] सतत हृदयामाजि धरितो २५

---

१ मंजूळ स्वर. २ रत्नसमुदायांचा. ३ कानांतल्या. श्रुतितल्या मणिगणांचा इ० अन्वय. ४ प्रत्युत्तर. ५ ऐकलेल्या. ‘जणों तें परिशिल्या वाणीला प्रतिवचन देशी असा अन्वय. ६ सरस्वती. ७ शिवाच्या गुणांना. *गाऊं लागली. ८ आनंदानें. ९ प्रशंसा १० ‘वाहवा!’ ‘खाशी!’ अशा शब्दांनीं. ११ आवाजाची गोडी. १२ सरस्वती. १३ वीणेला. १४ गवसणी करी इ० अन्वय. वीणा गुंडाळून ठेवते असा अर्थ. १५ ताज्या कमळाच्या कांतीला. १६ लक्ष्मीचा पाय लागून. १७ लालपणा. १८ चांगलें. १९ हाताची योग्यता. २० लाखेच्या रंगानें. २१ अत्यंत रक्त. २२ प्रहार व्हावा ह्मणून. २३ अशोकवृक्षाची. २४ चुरस, मत्सर. तरुण विलासवती स्त्रिया आपल्या वामचरणानें अशोकाला ताडन करितात व त्यामुळें त्याला बहर येतो अशी कविप्रसिद्धि आहे. भगवतीच्या चरणाचें आघातसुख अशोकाला मात्र आहे, आपणांस नाहीं; ह्मणून अशोकाचा मत्सर.

करी मिथ्या[1]गोत्रस्खलन शिव, तें मानुनि खरें
भवानी! तूं शीर्षीं[2] हाणिशि पद त्याच्या वलभरें
'भली केली!' ऐसें, स्मरुनि मनिं [3]तो रोष[4] पहिला
वदे नूपूरांच्या[5] मुखरणमिषें[6] मन्मथ[*] तिला[7] ॥ २६ ॥
तुझीं जीं पादाग्रें अतिमृदु तयांना क्षितितलीं
कवी कूर्मीपृष्ठासम[8] समजती, गोष्ट न भली[9]
विवाहीं[10] पाषाणीं[11] कठिनतमें गंगाधर तयां[12]
करीं[13] स्थापी[14]; हेंही अनुचित तया[15] होय सदयीं[16] ॥ २७
कचीं[17] कौटिल्यातें धरि, सरलता मंदहसितीं[18]
मृदुत्वाला गात्रीं[19], स्तनिं बहुत काठिन्य वरिती
अती सूक्ष्मा मध्यें[20], जगदवनकार्यीं[21] सकरुणी[22]
अशी शैवी शक्ती भुवनिं मिरवे एक अरुणा ॥ २८
शिवाच्या तूं अंतःपुरिं वससि तत्पट्टमहिषी[23]
तुझी पादार्चाही[24] चलमतिनरा[25] होइल कशी?

---

१ दाटून भलतें नांव घेणें. पार्वतीला हाक मारावयाचे वेळीं भलत्याच स्त्रीच्या नांवानें तिला शिवानें दाटून हांक मारिली असा अर्थ. २ मस्तकावर ३ प्रसिद्ध. ४ शिवानें आपणांस जाळून भस्म केलें तत्संबंधीं रोष. ५ तोरड्यांच्या. ६ आवाजाच्या रूपानें. *मदन. ७ भवानीला, पार्वतीला. मन्मथ तो पहिला रोष मनिं स्मरुनि नूपूरांच्या मुखरणमिषें तिला 'भली केली!' ऐसें ह्मणे असा अन्वय. ८ कासवीच्या पाठीसारखी. ९ योग्य. १० लग्नाच्या वेळेला. ११ अत्यंत कठिण अशा. हें 'पाषाणीं' याचें विशेषण. १२ पादाग्रांना. १३ हातांनीं. १४ ठेवी. १५ गंगाधराला. १६ दयायुक्त अशा. हें 'तया' याचें विशेषण. १७ केशाच्या ठिकाणीं. १८ मंदहास्याच्या ठिकाणीं. १९ अवयवांच्या ठिकाणीं. २० मध्यप्रदेशाच्या ठिकाणीं. २१ जगाच्या रक्षणाच्या कामीं. २२ दयायुक्त. २३ त्याची पट्टराणी. २४ पादपूजन. २५ चचल बुद्धीच्या मनुष्याला.

तुझ्या अंतर्द्वारीं विधिहरिमुख[1] श्रेष्ठ वसती
तयांना आठीही परम तिथल्या सिद्धि मिळती ॥ ३९ ॥
प्रदीपज्वालांनीं[2] रविसें[3] आरती[4] जेविं करणें
शशीला[5] चंद्रांशमप्रसृतसलिलीं[6] अर्घ्य[7] करणें
समुद्राची त्याच्या सलिलनिवहें[8] तृप्ति करणें
तसें त्वद्वाणीनें तवचि, जननि! स्तोत्र करणें ॥ ४० ॥

---

## अजविलाप.

साकी.

नैसर्गिकही[9] धैर्य लोपलें, कंठ दाटुनी आला
इंदुमतीच्या[10] विरहें अजनृप विलाप करिता झाला ॥ १ ॥
ताप लागतां कठिण जडें[11] तरी लोह द्रवोनि जाय
मृदुतनुधारी मनुजाची त्यापुढें कथा मग काय? ॥ २ ॥
'मृदु सुमनेंही पडुनि तनूवरि हरिताति प्राणास
हनन इच्छितां[12] विधिला[13] अल्पहि नसे साधनायास[14]' ॥ ३ ॥
'अथवा अंतक[15] मृदुवस्तूवरि मृदुचि टाकितो पाश
प्रथम निदर्शन[16] याचें नलिनी, जिचा करी दव नाश' ॥ ४ ॥
'बरें, होय ही माळचि मारक[17] ऐशी समज धरावी
तरी ठेवितां स्वहृदयिं सखिची वाट कां न मज दावी[18]' ॥ ५ ॥

---

१ ब्रह्मा, विष्णु वगैरे. २ दिव्याच्या ज्योतींनीं. ३ सूर्याला. ४ आरती. ५ चंद्राला. ६ चंद्रकांतमण्यापासून निघालेल्या उदकांनीं. ७ पूजोपचार. ८ उदकसंचयानें. ९ मूळचें, आंगचें. १० सूर्यवंशीय राजा अज याची पत्नी इन्दुमती, तिच्या ११ अचेतन. १२ मनांत आणिलें असतां. १३ विधात्याला. १४ साधनाची खटपट. १५ काळ. १६ उदाहरण. १७ मारणारी, प्राण घेणारी. १८ याला 'ती' हा अध्याहृत कर्ता.

‘ मना आलिया देवाजीच्या विषहि अमृत होईल!
अथवा अमृतहि कधीं कधीं तें विष होउनि जाईल!’ ॥६॥
‘ कीं दुर्दैवें विधि ही दावी वज्रप्रहरणलीला[1]
रक्षुनि तरु तो प्रहरि तयाच्या शाखाश्रितें वल्लीला[2]!’ ॥७॥
‘ आजवरी अपराध हातुनी माझ्या अगणित झाले
परि नचि झिडकारिलें तुवां मज एकवारही, बाले!’ ॥८॥
‘ अहह! आजि हें काय जाहलें कारण अणुहि नसोनी
मौनव्रत मजसवें, प्रिये! त्वां धरिलें काय म्हणोनी?’ ॥९॥
‘ वरुनि दावितों प्रेम तुला मी, गमलें तव चित्ताला
कारण गेलिस पुसल्यावांचुनि, सखये! परलोकाला’ ॥१०॥
‘ सखिच्या मागुनि गेलें[3] मग कां परत तिच्याविण आलों[3]
सैहो[4] म्हणुनि हा जीव अभागी स्वकर्मपरिणामाला[5]’ ॥११॥
‘ सुरतक्रीडा करितां मजशीं श्रम बहु तुजला झाले
तेणें कांते! घर्मबिंदु तव मुखकमलावरि आले’ ॥ १२ ॥
‘ तेही अजुनी तसेचि दिसती तुझा मात्र लय झाला
किती तरि अहा! नश्वरता[6] ही मनुजाच्या देहाला!’ ॥१३॥
‘ तुज दुखवावें अशी कल्पना मनांतहि न कधिं आली
मग मज टाकुनि जाया स्वर्गीं बुद्धि तुला कां झाली?’॥१४॥
‘ क्षितिपति ह्मणती मला ह्मणुनि कीं धरिशि मनामधिं दावा
शाब्दिक नातें असें खचित तें, तूंचि प्राणविसावा!’॥१५॥
‘ कुटिल, नील, कुसुमालंकृत तव पवन हलवि केशांस
जिवंत होउनि उठशिल ऐशी तेणें उपजे आस’ ॥ १६ ॥
‘ उठोनि चंद्रानने! ह्मणुनि मम विरहदुःख परिहारीं

१ वज्राच्या आघाताचा चमत्कार. २ शाखेचा आश्रय करून राहिलेल्या वेलीला. ३ यांना ‘ जीव ’ हा कर्ता अध्याहृत आहे. ४ सहन करो. ५ आपल्या कृतीच्या फळाला. ६ क्षणभंगुरता.

ओषधि जेवीं हिमनगतिमिरा निजतेजें संहारी ' ॥ १७ ॥
' वरतीं कुरळे केश विखुरले, शब्द एकहि न बोलें
ऐसें मुख तव पाहुनि दयिते ! हृदय बहुत हें पोळें' ॥१८॥
' आलिगुंजारव शांत जयांतिल, दीन आणि मिटलेलें
पंकज, तेवीं तुझें वदन हें आजि असें झालेलें ' ॥ १९ ॥
' इंदु, यामिनी; अंबुद, चपला; चक्रवाक, चक्रांगी;
फिरुनि भेटती परस्परांतें प्रेमें, चारुतरांगि !' ॥ २० ॥
' म्हणुनि तयांना सुसह वाटतो विरह, न तैसा मातें
भेट न आतां अपुली पुनरपि, जातों यमसदनातें ' ॥२१॥
' कोमलपल्लवशय्या ही तव मृदुतनुलागि रुपावी
तीच तनु अतां साहिल, सखये ! चिताधिरोहण केवीं ?' २२
' भेटशील तूं पुन्हां कदाचित् ऐशी होती आस
आजि प्राणेश्वरि ! परि गेली समूळ ती विलयास ' ॥२३॥
' सुंदर नयनानंदकर अशा असती वस्तु अपार
मनोविनोदनशीले ! तुजविण दिसती सकल असार ' ॥२४॥
' ज्यातें परिसुनि मोदभरानें रसिक तुकवितो मान
प्रियंवदे ! तव विरहें न रुचे कर्णमधुर तें गान !' ॥ २५ ॥
' वसंतलक्ष्मी रम्य उपवनीं करिते विविध विलास
कुरंगनयने ! तूं नसल्यानें रंग फिकाचि तयांस ' ॥ २६ ॥
' अलंकार रमणीय, मनोहर वसनें, निष्फळ झालीं
मृदुशय्येसहि आजि, विलासिनि ! काय अवकळा आली !' २७

---

१ तृणज्योति नांवाची लता. ही रात्रीं प्रकाशित असते. २ हिमालयाच्या अंधकाराला. ३ रात्रि. ४ मेघ. ५ वीज. ६ चितेवर चढणें. ७ नयनांला आनंद देणाऱ्या. ८ मनाला करमणूक करणारे प्रिये ! ९ वसंतशोभा.

‘ होतिस सखये! विश्वासाची गृहिणी चतुर हुषार
संकटकालीं दिलीस मसलत मजला हितकर फार ’ ॥२८॥
‘ एकांतांतिल हितगुज करुनी रंजविलेंसि मनास
प्रियशिष्याही होउनि शिकलिस संगीतादिकलांस !’ ॥२९
‘ ऐशा तुजला क्रूरकृतान्तें आजि हिरावुनि नेलें
हाय हाय ! मग काय राहिलें! सर्वस्वचि मम गेलें ’ ॥३०॥
‘ सुहास्यवदने ! सुगंध, रुचिकर, म्यां घेउनि उरलेलें
मधु[1] येथें आतांचि सखे! त्वां हर्षें प्राशन केलें ’ ॥ ३१ ॥
‘ त्यावरि आतां उष्णाश्रुप्[2]युत वैरतीं[3] पाठविलेला
जलांजली तूं घेशिल कैसा न कळे मम चित्ताला ’ ॥३२॥
‘ गजान्त लक्ष्मी अजगेहान्तरिं फुकट नांदते, बाले!
तुझ्याबरोबर खरें तयाचें सुख अस्तंगत झालें! ’ ॥३३॥
“ आम्रवृक्ष हा सरस, असे ही नामी प्रियंगुवेल
वाइ ! जोडपें किति तरि यांचें नयनां गोड दिसेल !” ३४
‘ असें बोललिस मात्र ! हातुनी घडलें नाहीं कांहीं
लगिन तयांचें न लावितां तुज जाणें योग्यचि नाहीं’ ॥३५॥
‘ ज्याचे दोहद[4] तुवां पुरविले वामचरणघातांनीं[5]
अशोक तो हा भरुनी जाइल, रसिके! मधुर फुलांनीं ’ ३६
‘ तत्सुमनांनीं आजवरी तव केश अलंकृत झाले
त्यांचा आतां अंजलि कैसा देऊं तुजला, बाले!’ ॥३७॥
‘ अखंड लक्ष्मी, दक्ष सखीजन, तनय रूपगुणवान
पति अजही हा तुला मानितो मुख्य साहवा प्राण ’ ॥३८॥

---

१ मद्य. २ उष्ण अश्रूंनीं भरलेला. मद्यावर उष्णोदकप्राशन करणें आयु:शास्त्रनिषिद्ध आहे हें येथें सहज सुचविलें आहे. ३ स्वर्गाला. ४ डोहळे. ५ डाव्या पायाच्या प्रहारांनीं. तरुणींनीं अशोकाला वामचरणानें प्रहार केला असतां त्यास फुलें येतात अशी कविप्रसिद्धि आहे.

‘ असा असुनिया प्राणसखे! हा थाटदार संसार
काय मांडिलें असे तुवां हें मरणकार्य अनिवार?’ ॥ ३९ ॥
‘ कटाक्ष चंचल हरिणीमध्यें, मंद गमन हंसींत
अभिनय पवनें डोलविलेल्या नवकोमलवल्लींत ’ ॥ ४० ॥
‘ मधुर बोल पिकवदनीं तेवीं, ऐसे गुण हे मागें
रमवाया मज तुवां ठेविले करुणा येउनिया गे! ’ ! ॥४१॥
‘ उपाय तव हे अपाय करिती तापवुनी मम काय
हाय हाय! पुरवेल जरी हें जीवित सोडुनि जाय’ ॥ ४२ ॥

---

## संमोहखंडन.

पादाकुलक.

धनार्जनाची सोडीं तृष्णा
मंदमते ! करिं मती वितृष्णा
निजकर्मानें मिळतें वित्त
त्यानें रंजविं अपुलें चित्त ॥ १ ॥
अर्थ अनर्थचि केवल आहे
त्यापासुनि सुखलवहि न लाहे
सुतापासुनिहि धनिका भीती
सार्वत्रिक ही दिसते रीती ॥ २ ॥
कमळावरचें जैसें पाणी
तैसें जीवित चंचल मानीं
आधिभुजंगें समस्त लोक
ग्रस्त जाहले करिती शोक ॥ ३ ॥
न करीं धनजनयौवनगर्व
काल हरी तें क्षणांत सर्व

---

1 हाव.

मायामय हें अखिल सोडुनी
ब्रह्मपदीं दे मती जोडुनी ॥ ४ ॥
नित्य करीं मनिं तत्त्वचिंतन
नश्वरवित्तीं ठेवुं नको मन
क्षणभरि येथें सज्जनसंग
एकंचि[1] करितो भवभयभंग ॥ ५ ॥
' असें कवण मी ? अलों कोठुनी ! '
विचित्र संसाराची सरणी
' स्त्री पुत्रादिक कोण कुणाचीं ? '
समज करुनि घे, बंधो ! याची ॥ ६ ॥
पैसा अडका मिळविशि जोंवरि
सगे सोयरे तुझे तोंवरीं
जरा आलिया मागुति देहीं
कोणी ही तुज पुसे न गेहीं ॥ ७ ॥
कामक्रोधादिकां निवारीं
' असें कोण मी ? ' मना विचारीं
आत्मज्ञानें विहीन असती
ते नरकांतरिं बुडोनि पचती ॥ ८ ॥
कल्पतरूचें मूल निकेतन[2]
शयन[3] भूमितल, अजिन[4] हि वसन[5]
सर्व[6]परिग्रहभोगत्याग
कवणा देई सुख न विराग[7] ! ॥ ९ ॥

---

१ एकचि ( एकटा ) सज्जनसंग इ० अन्वय. २ घर. ३ आंथरुण. ४ हरिणाचें कातडें. ५ वस्त्र. ६ आपल्या अशा मानलेल्या सर्व वस्तूंच्या उपभोगाचा त्याग. ७ वैराग्य.

बाल तोंवरी क्रीडनिं दंग
तरुण तोंवरी [१]अनंगरंग
वृद्धपणीं मग चिंतादीन
ब्रह्मपदीं नचि कोणी लीन ॥ १० ॥

जनन पुनरपी पुनरपि मरण
पुनरपि [२]जननीजठरीं शयन
संसारीं हे [३]स्फुटतर दोष
त्यांत कसा तुज वाटे तोष ! ॥ ११ ॥

शत्रुमित्रसुतबंधुसोयरीं[४]
वैर, मित्रता दोन्हीं न करीं
[५]सर्वभूतीं धरिं तूं समता
इच्छिसि झडकरि जरी ब्रह्मता ॥ १२ ॥

सांज सकाळ हि, तशि दिनरात
येतीं पुनरपि शिशिरवसंत
काल खेळतो जातें आयु
तरी न सोडितो [६]आशावायु ॥ १३ ॥

अंग गळोनी पिकलें [७]मुंड
दंतपंक्तिनें त्यजिलें [८]तुंड
कांपत कांपत करिं धरिं दण्ड
तरि न सोडिते [९]आशा [१०]पिण्डं ॥ १४ ॥

---

१ मदनाचा विलास. २ आईच्या उदरांत. ३ अगदीं ठळक. ४ ही सप्तमी आहे. ५ सगळ्या प्राण्यांच्या ठिकाणीं. ६ आशारूप वायु. आशावायु मला न सोडी असा अर्थ. ७ डोकें ८ तोंड. ९ आशा पिंड न सोडिते असा अन्वय. १० मांसाचा गोळा; अर्थात् देह. हें 'सोडिते' याचें कर्म. आशा 'सोडिते' याचा कर्ता.

मी, तुं इतरहि अवघे एक
हा तुज नाहीं हृदयिं विवेक
आत्मरूप हें सगळें पाहीं
भेद सोडुनी दे लवलाही ॥ १९ ॥

---

## सूर्योदय.

स्रग्धरा.

नि:सीमानंदकंद[1] प्रकटित[2] जणुं कीं मूर्तिमान्[3] पंकजांचा[4] !
कीं प्राणाधार[5] शोकज्वरविकल[6] अशा कोकसीमंतिनींचा[7] !
संहर्ता[8] तामसाचा[9], प्रियकर[10] अथवा लोकनेत्रांगनांचा[11]
आला हा पुंज[12] गुंजारुण[13] उदयगिरिप्रांतिं[14] दिव्यप्रभांचा[15] ! १
पद्मद्रोहा[16] करोनी धवलित करिती[17] व्यापुनी विश्व सर्व
ऐशा इन्दुद्युतींचा[18] झडकरि हरुनी नेति नि:शेष[19] गर्व
तेजानें निर्दळोनी[20] हिमकण[21], गिळिती भूतळींच्या तमातें[22]
त्या दैन्यध्वंसकांहीं[23] दिनकरकिरणीं[24] येउं पावित्र्य[25] मातें ॥२॥
भेदूनी भूरुहांचें[26] उदर पडति ज्या भूवरीं भानुमौला

---

१ अपरिमित आनंदाचा कांदा किंवा गड्डा. २ प्रगट झालेला. ३ शरीरधारी, ४ सूर्यविकासी कमलांचा. ५ जीवाला आधार. ६ दु:खसंतापानें व्याकुळ झालेल्या. ७ चक्रवाकस्त्रियांचा. पंकजें सूर्योदयीं प्रफुल्लित होतात व चक्रवाकमिथुनांचा संयोगही त्याच वेळीं होतो, या कविसंप्रदायाला अनुलक्षून येथें वर्णन आहे. ८ हनन करणारा. ९ अंधकारसमूहाचा. १० पति. ११ लोकांच्या नेत्ररूपी स्त्रियांचा. १२ गोळा १३ गुंजांसारखा तांबडा १४ उदयपर्वताच्या शिखरावर १५ स्वर्गांतील तेजांचा. १६ सूर्यविकासिकमलांचा द्वेष १७ याला 'ज्या' हा अध्याहृत कर्ता. १८ चंद्रकिरणांचा. १९ पूर्णपणें. २० नाहींसे करून. २१ दवाचे बिंदु. २२ अंधकाराला. २३ दैन्य दूर करणाऱ्या. २४ सूर्यकिरणांनीं. २५ पवित्रपणा. २६ झाडाचें. २७ किरणपंक्ति.

त्यांचे ठायीं धरीतो शुकशिशुनिवह[1] स्वर्णदण्डभ्रमाला[2]
वृक्षांच्या पल्लवाग्रीं[3] हिमकण किरणीं भानुच्या रक्त झाले
डाळिंबाचेचि दाणे समजुनि करि तो त्यांवरी चंचुचाळे ॥ ३ ॥
तोयांनीं[4] कुंकुमाच्या[5] सकलहि जगतीजाल[*] गेलें भिजोनी
गेले तेही मदांधभ्रमर[6] सुटुनिया पद्मबंधामधोनी[7]
ऐकूं येई द्विजांची[8] कलकल, दिसतें गोसहस्रप्रदान[9]
भाग्यें वृंदारकांच्या[10] हरिहयदयिते[11] जाहलें पुत्ररत्न! ॥ ४ ॥
जाणों कीं पर्वतांच्या सुविमलशिखरीं[12] हिंगुलें[13] लेप केला
वृक्षांच्या अग्रभागीं विलसति अथवा पल्लवोल्लासलीला[14]

---

१ लहानलहान पोपटांचा समुदाय. २ सोन्याच्या दांडीच्या भ्रांतीला हें 'धरितो' याचें कर्म. ३ वृक्षांच्या पल्लवाग्रीं भानुच्या किरणीं रक्त झाले (झालेले) हिमकण डाळिंबाचेच दाणे समजुनि त्यांवरी तो (शुकशिशुनिवह) चंचुचाळे करी (चोंची मारी)' असा अन्वय. ४ पाण्यानें. ५ केशराच्या. * भूमंडळ. ६ उन्मत्त भ्रमर. ७ सूर्यविकासिकमलरूप कारागृहांतून. ८ पक्ष्यांची. पुत्रोत्सवपक्षीं ब्राह्मणांची. ९ हजार किरण (भूमीवर) सोडणें; पुत्रोत्सवपक्षीं हजार गाईचें दान. १० देवांच्या ११. इंद्राच्या स्त्रीला. पूर्वदिशा इंद्राधिष्ठित असते यास्तव अशी कल्पना केली आहे. या श्लोकांत सूर्योदयावर पुत्रजन्माची कल्पना केली आहे. सूर्योदयाच्या वेळीं भूमंडळ अरुणवर्ण होतें; पूर्वदिवशीं सायंकाळीं पद्मामध्यें प्रतिबंधांत पडलेले उन्मत्त भ्रमर आपल्या बंधांतून मुक्त होतात; पक्ष्यांचा किलबिलाट सुरूं होतो; आणि सूर्य आपले सहस्र किरण भूतलावर सोडीत असतो असा चमत्कार दृष्टीस पडतो. या चमत्कारावरोबरच पुत्रजन्मोत्सवाचा प्रकार ह्मणजे भूमीवर कुंकुमाचा सडा, कैद्यांची सुटका, ब्राह्मणांची गडबड व गोप्रदानांची गर्दी या गोष्टींचेंही यांत वर्णन आलें आहे. १२ स्वच्छ शिखरावर. १३ हिंगुळानें. १४ पल्लवांच्या अत्यंतमधुरकांतीचा विलास.

किंवा प्रालेयपुंजीं विरेचित खदिरांगारसंघात होत
ऐसे ते भानुभानू तम पळवुनिया बुद्धिवृद्धी करोत ॥ ९ ॥

---

## कविप्रशंसा.

व. ति.

जी दूषणान्वित हि शून्यचि दूषणांनीं
तेवीं खरांकित हि कोमलवर्णखाणी
ऐशी अपूर्व कृति ज्या कविराजयाची
त्या वाल्मिकीप्रति असो नति आज यांची ॥१॥
ज्याची गिरी प्रसवली भुवनैकसार
श्रीभारत, प्रणति त्यास अनेकवार
तें होय आश्रय ह्मणोनिच भूषणानें
संज्ञा तदंक वरिली जनिं भारतीनें ॥ २ ॥
लोकीं जयास ह्मणती कविताविलास
तो वंद्य होय मजला कवि कालिदास
पाषाणही द्रवति यत्करुणारसानें
त्या वंदितों हि भवभूतिस आदरानें ॥ ३ ॥

---

१ बर्फाच्या ढिगावर. २ ठेवलेले, रचिलेले. ३ पुष्कळसे खराचे निखारे. ४ सूर्यकिरण. ५ अज्ञान. ६ ज्ञानवर्धन. * जी कृति, जो ग्रंथ. ७ विरोधपक्षीं दोषयुक्त. परिहारपक्षीं दूषणराक्षसाच्या नांवानें युक्त. ८ रहित. ९ दोषांनीं. १० विरोधपक्षीं कठोरवर्णांनीं युक्त; परिहारपक्षीं खरराक्षसाच्या नांवानें युक्त. ११ मृदु अक्षरांची खाण. १२ नमन. १३ प्रस्तुत ग्रंथकाराची. १४ वाणी. १५ भुवनांचा मुख्य सारभूत अंश. १६ भारत. १७ भारत आहे चिन्ह जिचें अशी. १८ वाणीनें. भारताचा आश्रय केल्यामुळें भारतीला भारतीपणा आला असा भाव. १९ कवितादेवीचा अभिनय. २० ज्याच्या (कृतीमधील) करुणरसानें.

झाली शिखंडिनि[1] शिखंडि[2] अशी पुराणी[3]
आहे कथा विदित, तेविंच आज वाणी[*]
व्हावें प्रगल्भ रसपूर्ण ह्मणोनि काय
बाणस्वरूप धरुनी अवतीर्ण होय ! ॥ ४ ॥

श्रीहर्ष[4] हर्षवि, गुणाढ्य[5] गुणीं विराजे
तेवीं सुबंधुहि[6] सहृज्जनबंधु[7] साजे
दावी सुकोमलपदें जयदेववाणी[8]
त्या शब्दसृष्टिजनकांस[9] कसा न मानीं[10] ? ॥ ५ ॥

जो[11] अग्रगण्य असताहि ' अकिंचनांत[12] '
मोठी ' समर्थ ' पदवी मिरवी जगांत
' स्वामी ' जयास ह्मणती असुनी हि ' दास '
तो साधुवर्य नमिला गुरु रामदास ॥ ६ ॥

सोपान[13] थोर अपवर्गमहोदयाचा[14]
सोपान[15], सोदर[16] दुजाहि निवृत्ति[17] ज्याचा
ती[18] मुक्ति होय भगिनी विमला विलोकीं
ज्ञानस्वरूप भगवान् स्वयमेव जो कीं ॥ ७ ॥

---

१–२ द्रुपदकन्या. ही तपोबलानें आपलें स्त्रीत्व एका यक्षाला देऊन त्याचें पुंस्त्व आपण घेऊन शिखंडी झाली अशी कथा आहे. ३ जुनी. * सरस्वती. शिखंडिनी मागें शिखंडी झाली तशी आतां वाणी बाण झाली असा शब्दचमत्कार ब आणि व यांच्या सावर्ण्यानें या श्लोकांत आलेला आहे. ४ नैषधकाव्य, रत्नावली वगैरेचा कर्ता. ५ बृहत्कथाकार. ६ वासवदत्तेचा कर्ता. ७ सहृदयलोकांचा बंधु ह्म० मित्र. ८ गीतगोविंदाचा कर्ता ह्याची वाणी. ९ कवींस. १० कसा मान देणार नाहीं ? ११ रामदास. १२ दरिद्री लोकांत. या पद्यांतील विरोधाभास अगदीं स्पष्ट आहे. १३ जिना, दादर. १४ मोक्षरूप मोठ्या उत्कर्षाचा. १५ सोपानदेव. १६ बंधु. १७ निवृत्तिनाथ. १८ मुक्ताबाई.

ऐसा कवीन्द्र नुतसाधुकुलावतंस[1]
श्रीज्ञानदेव नमिं तच्चरणांबुजांस[2]
गीतार्थबोध[3] करुनी जशि भारतीला[4]
केली तशीच बहु धन्य तेयें[5] महीला ॥ ८ ॥

भागीरथीविमलभंग[6] दुभंग[7] होती
तेणें अभंग परिभूत[8] तयां[9] करीती
ऐशी अलौकिक करी कृति वैश्य कोणी[10]
त्याचे धरीं चरणरेणु[11] शिरीं, नमोनी ॥ ९ ॥

वैराग्यकंद[12] कविहीर[13] कविप्रवीर[14]
श्रीरामचंद्रचरणीं रमला कबीर
त्याच्या पवित्र कृतिला नति[15] होय माझी
तेणें तुटो प्रबल हा भवबंध आजी ॥ १० ॥

श्रीभारतीचरण[16] सेवुनि थोर झाले
जन्मास फार असले कविवृन्द[17] आले
ती भारती परि जेयें[18] विलसे सनाथ[19]

---

१ स्तुतसाधुकुलांत श्रेष्ठ. २ त्याच्या पादकमलांस. ३ श्रीमद्भगवद्गीतेच्या अर्थाचें ज्ञान. ज्ञानेश्वरीचा. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ गीतेवरील मराठी भाष्य आहे. त्यानें गीतार्थाचा प्राकृतजनांस बोध करून दिला. ४ वाणीला. ५ ज्ञानेश्वरांनीं. ६ गंगेचे पवित्र तरंग. ७ छिन्नभिन्न, नष्ट. ८ तिरस्कृत. ९ तरंगांना, लाटांना; अभंग आपल्या अभंगत्वामुळें भंगुर अशा भागीरथीतरंगांना जिंकते झाले असा अर्थ. १० अर्थात् तुकारामबोवा. ११ पायधूळ. १२ वैराग्याचा कांदा किंवा गड्डा. १३ ज्ञानिश्रेष्ठ. १४ काव्यें करणारांत प्रमुख. १५ नमन. १६ सरस्वतीचे पाय. १७ कविसमुदाय. १८ ज्यामुळें. १९ पतियुक्त. सरस्वतीच्या चरणाचे दास असे कवि अनेक झाले; परंतु तिचा पति म्हणवून घेण्याची योग्यता एकनाथमहाराजांच्या ठिकाणींच कायती आहे असा भाव.

तो एक एथ मिरवे कवि एकनाथ ! ॥ ११ ॥
सर्वांहुनी प्रिय गमे परमेश्वरासी
ठावा असा तुळशिचा महिमा जनांसी
तद्दास[2] त्यास[3] तिजहूनहि होय मान्य !
सद्ग्रंथ तो तुळशिदास जगांत धन्य ! ॥ १२ ॥
मुक्तेशकाव्य बघुनी हृदयीं न मावे
आनंद, आज न तयासि कसें नमावें ?
ज्याचें जनीं श्रुत असे सकलांस नाम
त्या श्रीधराप्रति करीं प्रणयें प्रणाम ॥ १३ ॥
नांवेंचि वामन[4], अवामन[5] कीर्तिखाणी
ज्यालागि वाम[6] न सुधामधुगीत[7] वाणी
दे ती[8] प्रतिक्षणिं सुतोष[9] नवा मनाला
वंदीं[10] अशा भुवनवंदित[11] वामनाला[12] ॥ १४ ॥
षड्जेतर[13]स्वरविकारहि पूर्ण ठावा
संरक्तरामघन[14] यद्हृदयीं वसावा
सन्यस्तपक्ष[15] करि विष्णुपदीं[16] विहार

---

१ श्रीविष्णूला. २ तुळशीदास. ३ परमेश्वराला. ४ लघु. ५ मोठ्या कीर्तीची खाण. ६ प्रतिकूल. ७ अमृत आणि मध यांनीं जिची स्तुति केली अशी वाणी. ८ वाणी. ९ विशेष आनंद. १० मी वंदन करितों. ११ भुवनानें वंदिलेला. १२ वामनपंडितांना. १३ षड्जाहून इतर ध्वनिप्रकार. १४ ( भक्ताविषयीं ) अनुरागयुक्त रामरूप मेघ. १५ सोडलेला आहे भेद ज्यानें असा; अभेददर्शी. १६ परमेश्वरपदीं.

तो अद्भुत द्विजमयूरहि वंद्य फार ॥ १५ ॥
जी नाचली तुणतुण्यावरि पूर्वरंगीं
झाली पवित्र पुढतीं हरिनामसंगीं
ती रामजोशिकविची नवपद्यलीला
नाहीं कशी रमविणार महन्मतीला ? ॥ १६ ॥
चित्तास फार चटका फटका अमोल
लावीच एक घटिका लटिका न बोल
ऐशी चमत्कृतियुता कविता कवीन
फंदी अनंत करि, त्या न कसा नमीन ? ॥ १७ ॥
भांडार थोर परभक्तिरसायनाचें
ऐसे प्रसिद्ध असती कटिबंध ज्याचे
तो शेवटीं अमृतराय नमावयास
सप्रेम नम्र करितों निजमस्तकास ॥ १८ ॥

---

१ अलौकिक. २ ब्राह्मण मयूरकवि. सामान्य मयूरपक्ष्याला षड्जाशिवाय इतर स्वरविकार ठाऊक नसतात; सजलनीलघनाशिवाय इतर घन त्याच्या ध्यानाचे विषय नसतात; आणि पंखाशिवाय आकाशांत संचार करण्याचें सामर्थ्य त्याला नसतें; तेव्हां या सर्व गोष्टी करणारा जो द्विजमयूर तो अद्भुतच ह्मटला पाहिजे. 'स्वर,' 'संरक्तराम,' 'पक्ष,' 'विष्णुपद,' आणि 'द्विज,' या पदांवरील श्लेष वरील स्पष्टीकरणावरून सहज स्पष्ट होतील. *रामजोशी यांचें पूर्ववय डफावर लावण्या ह्मणण्यांत गेलें, पुढें त्यांनीं आपल्या वाणीचा हरिनामाच्या ठायीं उपरम केला असें समजतें. २ नवीन किंवा मधुर पद्यांचा विलास. ३ चमत्कारयुक्त. ४ कविश्रेष्ठ. ५ त्या कसा न नमीन इ० अन्वय. ६ ईशभक्तिरूप रसायनाचें.

# रतिविलाप.

साकी.

नंतरें विधिनें सावध केली मूर्च्छित मन्मथजाया[2]
दुःसह नूतनवैधव्याचें परमदुःख सोसाया ॥ १ ॥
पाहुं लागली स्वस्थमनानें ती उघडुनि नयनांला
न वाटलें पति नष्ट होउनी दर्शनदुर्लभ झाला ॥ २ ॥
प्राणविसाव्या! असे कुशल कीं? सांग तुझें पतिराया!
असें वदोनी स्तिमित जाहली पंचशराची[3] जाया ॥ ३ ॥
[4]शिवनयनाग्निज्वाला भडकुनि जो उदयाला आला
भस्मराशि तो पुरुषाकृति तंव दिसला तन्नयनांला ॥ ४ ॥
त्यायोगानें पुनः एकदां दुःखें व्याकुल झाली
धरणीवरती लोळुनि तत्कुचिं धूसरता[5] बहु आली ॥ ५ ॥
[6]अलक विखरुनी हृदय ताडुनी विलपे मनसिजकांता[7]
स्वसमचि जाणो करी भूमितें त्या समयीं विरहार्ता! ॥ ६ ॥
'तव-वपु[9] होतें अगा प्रियकरा! लावण्याची खाण
रसिक विलासी जनांस गमलें तें सुंदर उपमान[8]' ॥ ७ ॥
'दग्ध जाहलें तें! परि मम हें हृदय न भंगुनि जाई!
ठीकचि; अबला निष्ठुर असती! नवल काय मग बाई!' ८
तुझिया जवळी प्राण जयाचे ऐशा यांहि[10] जनाला
टाकुनि केलें गमन कुठें त्वां? सांडुनिया प्रणयाला[11] ॥ ९ ॥

---

१ शिवानें मदनाला जाळून भस्म केलें, तेव्हां त्याची स्त्री रति हिनें त्याच्याकरितां विलाप केला तो या पद्यांत वर्णन केला आहे. २ मदनाची बायको. ३ मदनाची. ४ शंकराच्या डोळ्यांतून निघालेली अग्नीची ज्वाला. ५ मलिनपणा. ६ कुरळे केश. ७ मदनाची स्त्री. ८ ज्याची उपमा द्यावयाची अशी वस्तु. ९ वपु, शरीर. १० मद्रूपजनालासुद्धां. ११ प्रेमाला.

'जलौघ पाडुनि सेतुबंधना जलैंजीवितनलिनीला
सोडुनि जातो, तशीच तव कृति आहे प्रियंकरशीला!' १०
'परोपरीनें माझ्या मनिंची तुवां पुरविली आस
स्वप्नांतहि मम अप्रिय नाहीं शिवलें तव हृदयास' ॥११॥
'मीही होतें सदा जिवलगा! आज्ञांकित तव दासी
तोषविलें तुज जें जें प्रिय तें तेंचि करुनि सर्वांशीं' ॥१२॥
'प्रणय असा हा परस्परांमधिं अनुपम असता झाला
मग मज टाकुनि गेलासी कां आजी परलोकाला?' ॥ १३॥
'निष्कारण कीं असें करिशि तूं सांगें मजला आतां
शोकाकुल मी फारचि झालें, धांवें जीवितनाथा!' ॥ १४ ॥
'हाक मारितां मज, भलतीचें नांव वदनिं तव आलें
ह्मणुनि मेखलाबंधन केलें तुज, तें मनिं कीं आलें' ॥ १५॥
'कर्णावरच्या सुगंधकमलें ताडन केलें तेव्हां
पराग त्यांतिल नयनीं रुपुनी दुःख जाहलें तें वा' ॥ १६ ॥
'"अगे प्रिये! मम हृदयीं वससी," मधुर वचन हें फार
वदलासी तूं मज लागोनी रसिका! वारंवार' ॥ १७ ॥
'असें सर्व तें मिथ्या! मजला भूल पाडिली काय!
कारण, तव वपु नष्ट जाहलें; परि मी अविकृतकाय! ॥१८
'तुज्या जीविता! प्रिया अनंगा! मी ही येतें आतां
तुझी जयामधिं नूतन वसती त्या लोकींच्या पंथा' ॥ १९ ॥
'सकलहि फसला जीव लोक हा, हानि जाहली फार

---

१ पाण्याचा लोंढा. २ बंधाऱ्याला. ३ जल हेंच आहे जीवन जिचें अशा कमळवेलीला. ४ प्रिय आहे शील ज्याचें अशा. ५ पूर्णपणें. ६ कटिसूत्रानें बंधन. ७ तें तुला आठवलें कीं काय? ८ किंवा. ९ विरूप झाला नाहीं देह जिचा अशी.

कारण, अखिलांचा तूं असशी, दयिता! सौख्याधार' ॥२०॥
'पुरमार्गामधिं वर्षाकालीं पसरे तम[1] घने[2]घोर
विजा चमकती, गडगड गडगड होतो घनरव घोरें[3]' २१
'अशा समयिं अतिभीतकामिनी प्रियजनगेहा[4] न्याया
कवण तुजविणें समर्थ आहे? या लोकीं, पतिराया!' ॥२२॥
'अरुणलोचनें अपुल्या वीर्यें चंचल करि जो फार
ज्यायोगानें भाषणामधें स्खलनहि[5] वारंवार' ॥ २३ ॥
'असा वारुणीमद[6] तरुणींचा उपहासाप्रति जाय
तूं नसतां प्रियतमा! तयाची इथें प्रतिष्ठा काय?' ॥ २४ ॥
'निष्फल ज्याचा[7] उदय तुझ्याविण, तो विधु[8] तव विरहानें
शुक्लपक्षिंही सोडिल अपुली कृशता अतिदुःखानें[9] ॥ २५ ॥
'नील, अरुणही किंचित् सुंदर ऐसा देठ जयांचा[10]
मधुरपिकरवें[11] सूचित होतो बहरहि तेविं जयाचा' ॥२६॥
'रसालतरुचा[12] नवीन मोहर असा, कोण नर आतां
'तुजविण शरसम[13] योजायातें आहे? जीवितनाथा!' ॥२७॥
'नेहमिंची तव धनुची मौर्वी भ्रमरावलि[14] ही, कांता!
'मजला पाहुनि शोकाकुल जणुं होत असे ती आतां' ॥२८॥
'हृदयानंदा! प्राणवल्लभा! पुनरपि, पंचशरा हे!
अभिनवसुंदर शरीर धारण करुनि उभा तूं राहें' ॥२९॥
'सुंदर मधुरालाप कराया नलगे जिस शिकवावें
दूति करुनि रतिसमयीं ऐशा कोकिळेसि धाडावें' ॥३०॥

---

१ अंधकार. २ दाट. ३ भयंकर. ४ प्रियजनाच्या घराला. ५ अडखळणें. ६ वारुणीनामक मद्याचा माद. ७ ज्या विधूचा. ८ चंद्र. ९ मोठ्या कष्टानें. १० ज्या मोहोराचा. ११ कोकिलेच्या मधुरस्वरानें. १२ आंब्याच्या झाडाचा. १३ शराप्रमाणें, बाणाच्या ठिकाणीं. १४ भ्रमरांची पंक्ति.

‘ सुगंध, कोमल, विकसित सुमनें गुंफुनिया त्वां हार
प्रेमभरें मम गळां घातले स्वतां करानें मार ! ’ ॥ ३१ ॥
‘ कर्णावरतीं रम्य कुसुमही ठेवियलें प्रणयानें
वेणीवरतीं सुभगेतर सुमें रचिलीं निजहस्तानें ’ ॥ ३२ ॥
‘ अलंकार हे पुष्पांचे मम अंगीं दिसती ताजे
परि, रतिकुशला ! तुझें न दिसतें वपु तें काम्य सदा जें’ ३३
‘ लाक्षारस तूं लावित असतां दयिता ! मम चरणाला
दुष्टसुरांनीं तुला धाडिलें घोरकर्मकरणाला ’ ॥ ३४ ॥
‘ अर्धं टाकुनि रंग लावणें झडकरिं तूं गेलास
ह्मणुनि पुनरपी येउनि तोची पुरता लावि तयास ’ ॥३५॥
‘ रमणीरमणा ! स्वर्गीं येतें अंकीं तव बैसाया
जोंवरि सिद्ध न तुला सुंदरी देवांच्या भुलवाया ’ ॥३६ ॥
‘ प्रिया ! यावया सिद्ध जाहलें असेंचि तुझिया मागें
तरि “रति जगली मदनामागें” ही दुष्कृति जनिं जागे’ ३७
‘ देह अलंकृत कसा करूं तव ? परलोकस्था कामा !
एकचि कालीं गेलें जीवित देह तसा, अभिरामा ’ ! ॥३८॥
‘ अंकावरतीं घेउनिया धनु बाण सरळ करितांना
वसंतभावोजीशीं सस्मित बोलतही असतांना ’ ॥ ३९ ॥
‘ सहज फेंकिले तुवां कटाक्ष प्रेमानें, पतिराया !
आठवतो तव विलास सगळा आतां सर्व जनाऱ्या ’॥४०॥
‘ तुझा प्रियसखा, मदना ! आतां वसंत कोठें गेला
ईशें तर त्यासही नव्हेना मृत्युपथाला नेला ’ ? ॥ ४१ ॥
अशा प्रकारें विलाप रतिचा परिसुनि मदनसहाय
वसंत चित्तीं व्याकुल झाला, ह्मणे ‘ विघ्न हें काय ? ॥४२॥

---

१ हे मदना! २विशेष सुंदर. ३लोभनीय. ४ घोर कार्य करण्याकरितां.
५ कायम आहे. ६ मांडिवर. ७मंदहास्य करीत. ८मला. ९ मदनाचा मित्र.

शोक करोनी शिणली वहिनी तिजला शांत कराया
त्वरितगतीनें कुसुमाकर तइं त्या पातला ठायां ॥ ४३ ॥
त्याला पाहुनि रडे कोसळे तदा मदनदयितेला
स्वजन पाहतां दुःखितदुःख त्यजितें मर्यादेला ! ॥ ४४ ॥
वदे ‘ वसंता ! काय जाहलें पहा तुझ्या सुहृदाचें !
शरीर होउनि दग्ध भस्म हें उडे वायुनें त्याचें !’ ॥४५॥
‘ प्रिया ! इथें हा वयस्य माधव उत्सुक तुज भेटाया
यावें रमणीजनप्रिया ! त्वां दर्शन यातें द्याया ’ ॥ ४६ ॥
‘ दयितेवरचें चंचल असतें प्रेम फार पुरुषाचें
मित्रजनाच्या वरचें अतिदृढ तथापि, मदना! त्याचें ’ ॥४७॥
‘ कमलतंतु ते मौर्वी, कोमलसुमनें ज्याचे बाण
ऐशा धनुनें करि माधव तव जग आज्ञांकित जाण ’ ॥४८॥
‘ घाला घालुनि विधिनें नेलें माझ्या प्रियमदनाला
विरहें माझे अर्धे प्राणचि गेले यमसदनाला ! ’ ॥ ४९ ॥
‘ ह्मणुनि माधवा ! लवकरि माझें करीं एक हें काज
अग्नि देउनी प्रियाकडे मज पोंचविण्याचें आज ’ ॥ ५० ॥
‘ इंदुसवें जातसे चंद्रिका, घनासवें चपला वा
स्त्रीहि पतिसवें, धर्म असा हा पूर्ण जडांसहि ठावा’ ! ॥५१॥
‘ प्रियगात्रांचें सुभग भस्म हें पयोधरां लावून
सुमशय्येवरि तसें पावकीं बसेन मी जाऊन ’ ॥५२ ॥
‘ अनेक वेळां दोघांचेंही सहाय केलें फार
रचुनि, माधवा! सुंदरसुमनीं शयन परम सुकुमार ’ ॥५३॥
‘ परी वसंता ! चिता रचाया लवकरि लागे आतां

---

१ वसंत. २ मदना ! ३ वसंत. ४ काम. ५ चांदणें. ६ वीज. ७ अचेतनास. ८ मदनाच्या अवयवांचें. ९ अग्नीमध्यें. १० बिछाना.

प्रार्थियतें तुज येवढेंच मी जोडुनि दोन्ही हातां'॥ ९४॥
'मला दिलेल्या अग्नीला मग करीं प्रज्वलित वातें
मलपर्वतापासुनि येत्यां, सत्वर अपुल्या हातें'॥ ९५॥
'विदित असे तुज, माझा मदन प्राण बहिश्चर आहे
सदय तयाचें हृदय विरह हा किती वेळ तरि साहें'?९६
'भस्म जाहल्यावरि मजलागीं एक जलांजलि द्यावा
पान करिल तो जाण मजसवें स्वर्गीं प्राणविसावा' ९७
'रसालतरुच्या सरसमंजिऱ्या अर्पीं मग मदनाला
पिंडदानविधिसमयिं, माधवा! त्या प्रिय फार तयाला' ९८

---

## दमयन्ती.

व. ति.

राजन्! विदर्भतनया विपिनांत आली
तापे प्रचण्डकिरणीं जिथ अंशुमाली
तन्वी दिसे तनु तिची विरहव्यथांनीं
शोकार्त होउनि वदे अतिदीन वाणी ॥ १ ॥

---

१ येणाऱ्या. २ बाहेर हिंडणारा. ३ अगा धर्मराजा! धर्म वनवासांत असतां एके दिवशीं बृहदश्व ऋषि त्याच्या भेटीस आला. त्यासमयीं त्या ऋषीनें धर्मराजाला नलोपाख्यान सांगितलें. त्यांतील दमयंतीचा नलविरहप्रसंग प्रस्तुत पद्यांत थोडासा वर्णिला आहे. यांत कोठें दमयंती आपणांशींच बोलत आहे, कोठें नलाला संबोधून विलपत आहे आणि कोठें नलप्रवृत्त्यर्थ अन्याशीं भाषण करीत आहे. ४ दमयंती. ५ सूर्य. ६ कृश. ७ याला 'ती' हा अध्याहृत कर्ता.

'प्राणेश्वरा ! त्यजिसि कां मज एकलीला
होऊनिया वश तया अदया कलीला ?
गेलास, हाय ! नलराय ! कुठें ? वदान्या
अन्या न होय भुवनीं मजशी अधन्या ' ॥ २ ॥

'त्वां अश्वमेध करुनी बहु दान केलें
वैरी तसें यशहि थोर दिगन्ति नेलें
ऐसें असोनि दयितेविषयीं न वाटे
चित्तीं दया ! तव दयानिधि काय आटे ?' ॥३॥

'जें जें समक्ष वदलासि मला, उदारा !
तें तें प्रिया ! स्मर; कशी त्यजितोस दारा ?
जें काय हंस वदले तुजला मलाही
आणूनि तें मनिं विचार करूनि पाहीं ' ॥ ४ ॥

'प्राणप्रिया सत्हृदया ! वद शब्द कांहीं
प्राणप्रियेस तव रक्षक येथ नाहीं
मंदस्मिता करुनि हर्षविलेंसि जीतें
कां आजि मौन धरुनी छळितोसि तीतें ?' ॥ ५ ॥

'ज्याचें पवित्रतम नाम जगास तारी
औदार्य अर्थिजनसंघविपत्ति वारी
यद्वीर्य वैरितरुणीनयनांबु हारी
तो कां विपन्नवनितार्ति न दूर सारी ?' ॥ ६ ॥

'राजे दुजे बहु तथापि तयांत साजे

---

१ तया अदया कलीला वश होऊनिया इ० अन्वय. २ उदारा !
३ मजसारखी. ४ यज्ञविशेष. यांत अश्वाचें हवन करावें लागतें.
५ याचकजनांच्या समुदायाचें दारिद्र्य. ६ शत्रूंच्या स्त्रियांचे अश्रु.
७ दुःखामध्यें पडलेल्या स्त्रीचे हाल.

तेजें निजें अधिक, इंदुहि ज्यास लाजे
वाजे जनीं सतत यत्कृतिचा नगारा
त्याची वनीं विलपते प्रिय[1]धर्मदारा ! ' ॥ ७ ॥

' मी मन्दभाग्य चुकल्या हरिणीप्रमाणें
रानावनांत भटकें बहु दीनवाणें
आक्रोशही करितसें तुज आठवोनी
संतापशांति करिं बोलुनि गोड वाणी ! ' ॥ ८ ॥

' या शैलभूवरिं, नला ! अथवा वनांत
सिंहादि हिंस्रपशु ज्यांमधिं हिंडतात
देखें न मी तुजसि निद्रित बैसला वा
नाहीं तुझ्याविण मला दुसरा विसावा ! ' ॥ ९ ॥

' आला, अगा प्रियतमा ! मृ[2]गराज आला
वाटे न धीर लवही मम मानसाला
धांवें, नुपेक्षिं; तुजवांचुनि सांग आतां
रक्षील कोण अबला इथ ही अनाथा ? ' ॥ १० ॥

' " नाहीं मला प्रिय दुजें तुजवांचुनीया "
ऐसें पुनः पुनरपी वदलासि राया !
तें काय होय, र[3]मणा ! लटिकेंचि सारें ?
सत्यप्रिया ! फसवितोसि मला कसा रे ? ' ॥ ११ ॥

' हें केवढें नवल थोर दिसे अगाई !
टाकूनिया मजसि दूर मृ[4]गेन्द्र जाई !
हा हाय ! हाय ! विरहानलताप जाळी
केवीं टळेल विधिनें [5]लिहिलें कपाळीं ? ' ॥ १२ ॥

' उ[6]त्तुंगसानु हिम[7]गौर गिरी अगाई !

---

१ आवडती पत्नी. २ सिंह. ३ हे प्रिया ! ४ सिंह. ५ लिहिलेलें.
६ उंच आहेत शिखरें ज्याचीं असा. ७ बर्फाच्या योगानें शुभ्र.

हा येथ; यास पुसतें प्रियवृत्त[१] बाई!
याचेवरी करिति मोर सुनृत्यलीला[२]
वर्षागमीं[३] बघुनि नीलघनावलीला[४] ' ॥ १३ ॥
' प्राणेश्वरास फिरतें विपिनीं पहात
कोठेंहि तो न दिसतो, झुरतें मनांत
शोकें उलें हृदय, शून्य दिसे धरा ही
कोठें नगेन्द्र[५]! मम जीवितनाथ राही? ' ॥ १४ ॥
' तो पुण्यसंचय[६], निकेतन[७] सद्गुणांचें
सौंदर्यसार[८], गृह तो जयदेवतेचें[९]
श्रीचें[१०] विलाससदन[११] प्रिय, तो नरेन्द्रें[१२]
वर्णू शकेल तरि काय तया कवीन्द्रें[१३]? ' ॥ १५ ॥
' ऐसा अनंतगुण[१४] तो नलराज आहे
प्राणेश[१५] जाण मम, तद्विरहा न साहें
हें दुष्ट जीवित कसें दुरिं जात नाहीं
देहास सोडुनि, पहा! अति यातना[१६] ही ' ॥ १६ ॥
' कोणास जाउनि पुसूं " मम कांतकाय[१७]
त्वां पाहिलासि विपिनीं नलराज काय? "
" तूं शोधितेस दमयंति! जया प्रियातें[१८]
तो हा; " असें वचन कोण वदेल मातें? ' ॥ १७ ॥

---

१ नळाची बातमी. २ सुंदर नृत्याचा विलास. ३ पावसाळ्याच्या आरंभीं. ४ पाण्यानें ओथंबलेल्या काळ्या भोर ढगांच्या रांगेला. ५ अगा पर्वतश्रेष्ठा हिमालया! ६ पुण्याचा निधि किंवा सांठा. ७ घर, भांडार. ८ सौंदर्याचा तात्विक अंश. ९ विजयरूप देवतेचें. १० लक्ष्मीचें ११ क्रीडाभवन. १२ नरांमध्यें श्रेष्ठ, अर्थात् राजा. १३ कविश्रेष्ठ. १४ अनंताप्रमाणें किंवा अनंत ह्मणजे अपरिमित आहेत गुण ज्याचे असा. १५ प्राणांचा धनी; अर्थात् पति. १६ क्लेश. १७ सुंदर आहे देह ज्याचा असा. १८ पतीला.

## बोधामृत.

### ओंवी.

श्रीरामाची सहधर्मिणी[1]
दशवदनें[2] नेली वनांतुनी
रत्नाकर[3] पडला बंधनीं[4]
दुर्जनसंबंध नसावा ॥ १ ॥

हरिला अंधसुतें[5] अर्थ[6]
तया जिणावया समर्थ
तरी वन सेविती पांडव सपार्थ[7]
सुज्ञें समय[8] पाळावा ॥ २ ॥

स्वराज्यमदें नहुषनृपति
कोपविता झाला मुनींप्रति[9]
होवोनि सर्प पडला क्षिती[10]
दर्प[11] नसावा ऐश्वर्यवंतां ॥ ३ ॥

मारावया देवकीतनया
उपजली बुद्धी कंसराया
वसुदेव सूक्तींनीं[12] वळवी तया
सामें[13] मूर्खा वश करावें ॥ ४ ॥

बंधो ! त्यजी अविचारमद
ऐसा दशकंठाशीं बुद्धिवाद
करितां बंधन पावला धनेंद[14]

---

१ जाया, पत्नी, बायको. २ रावणानें. ३ समुद्र. ४ सेतुरूप बंधनामध्यें. ५ दुर्योधनानें. ६ संपत्ति. ७ अर्जुनासह. ८ वचन, प्रतिज्ञा. ९ अगस्ति वगैरे मुनींस. १० भूमीवर. ११ गर्व. १२ मधुर किंवा उपदेशपर वचनांनीं. १३ सामोपचारानें. १४ कुबेर.

मूढास बोध अनर्थावह ॥ ५ ॥

लंकेश्वर गर्वराशी
झगडा करी कार्तवीर्याशीं
क्रीडामृगसम पडला पाशीं
बलिष्ठाशीं विरोध नसावा ॥ ६ ॥

यजनसमयीं शिशुपालें
हरीशी दुर्भाषणीं निंदिलें
तेणें तया निधन[1] पातलें
म[2]हनीयां न निंदावें ॥ ७ ॥

सकलवीरकुलभूषण
श्रीकृष्णाचा बहिश्चर प्राण
[3]नर्तकी होय तो अर्जुन
कालोचित वृत्ति आदरावी ॥ ८ ॥

[4]एककलात्माही नि[5]शारमण
शंभुशिरीं पावे मान
तेवीं न अं[6]बरीं ही कला[7]पूर्ण
महदाश्रयें महत्त्व येतें ॥ ९ ॥

श[8]रतल्पीं [9]गांगेय पहुडला
त्यापासोनि धर्में धर्म परिशिला
तेणें मनिंचा संशय फिटला
[10]आप्तोपदेश हितकर ॥ १० ॥

---

१ मृत्यु. २ थोरांना. ३ नृत्य करणारी स्त्री. ४ एक कला राहिली आहे ज्यांत असाही. ५ चंद्र. ६ आकाशांत ७ षोडशकलांनीं युक्त असतांही. ८ बाणांच्या शय्येवर. ९ भीष्म. १० यथार्थवक्त्याचा उपदेश.

पृथुक[१] उपहारार्थ[२] घेउनी
श्रीकृष्णा भेटला सुदामा द्विजमणी[३]
गेलें तयाचें दारिद्र्य फिटूनी
संकटीं सन्मित्र सेवावा ॥ ११ ॥

अंबरीष विश्रुत विष्णुदास
त्यावरी अकारण कोपे दुर्वास
तेणें सुदर्शन भ्रमवी तयास
अस्थानीं क्रोध न दावावा ॥ १२ ॥

हिरण्यकशिपू यदृच्छेनें[४]
संचार करी जिये दिशेनें
तिजला संभाविती[५] निर्जर[६] नमनें
दुर्जन दुरोनि वंदिजे ॥ १३ ॥

द्रुपदसुतेविषयीं काम
धरी अंतरीं कीचक अधम
तयाचा वध करी भीम
परस्त्रीवांच्छा नसावी ॥ १४ ॥

क्षात्रधर्म मनीं आणून
समरीं धनुर्धारी होऊन
झगटला स्वजनाशी अर्जुन
स्वधर्म कठिणही आचरावा ॥ १५ ॥

---

१ पोहे. २ भेटीकरितां. ३ ब्राह्मणश्रेष्ठ. ४ सहज, अहेतुकपणें, निरुद्देश. ५ मान देती. ६ देव.

बलदर्पितलंकेश्वर
तृणतुल्य मानी शूर नृपवर
तयासी जिंकिती वानर
मुज्ञें गर्व न धरावा ॥ १६ ॥
वेधिती मातेचे वाक्शर
तेणें तप आचरी दुश्चर
परमपद पावला ध्रुवकुमार
व्यवसायात्मिका बुद्धि असावी ॥ १७ ॥
वीर्यविनयादिगुणसंपन्न
कुरूंनीं वधिला सुभद्रानंदन
तरी गतशोक पार्थ करी रण
गताचा शोक न करावा ॥ १८ ॥
युद्धार्थ येतां दशवदन
अर्पूनि तया पुष्पकविमान
धनद करी अलकारक्षण
अल्पदानें बहु रक्षावें ॥ १९ ॥
फारा दिवशीं आला भेटी
श्रीकृष्ण परमात्मा जगजेठी
कुंती निवेदी व्यसन मारोनि मिठी
सुहृदा हृद्गत कळवावें ॥ २० ॥
सव्यसाची धनुर्धर अर्जुन
त्यासी जिंकी बभ्रुवाहन

---

१ शक्तीच्या योगानें गर्वयुक्त झालेला रावण. २ मोक्ष. ३ निश्चयरूपा. ४ अभिमन्यु. ५ गेला आहे शोक ज्याचा असा होत्साता. ६ जगांत सर्वांत श्रेष्ठ. ७ संकट.

तरी आनंदें तयाचें मन
पुत्रकरीं पराभव भूषण ॥२१ ॥
गर्भस्थ असुर प्रल्हाद
तया उपदेशी मुनिवर नारद
पावला तेणें परमपद
सदुपदेश [1]अमोघफल ॥ २२ ॥

---

१ हटकून फल देणारा; व्यर्थ न जाणारा.

REFBK-0000098